
दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ८१ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.१७ जानेवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# विद्यापीठांमध्ये ‘पर्यावरण संवर्धन’ हा विषय शिकविला जावा-राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन

## लोकशिक्षण, संशोधन,अंमलबजावणी हीच पर्यावरण संवर्धनाची त्रिसूत्री–आ.मुनगंटीवार

## इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन क्लायमेट चेंज–२०२५ चे उद्घाटन



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शिक्षणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे धडे देण्याची गरज आहे. त्यासाठी पर्यावरण शिक्षणाला प्राधान्य द्यावे लागेल. पर्यावरण संवर्धन किंवा संरक्षण असा विषय प्रत्येक विद्यापीठात शिकविला जावा त्यातून पर्यावरणतज्ज्ञ तयार होतील. पर्यावरण रक्षणाच्या नव्या कल्पना जन्माला येतील. नवे प्रयोग होतील आणि त्यातूनच संवर्धनाचे नवनवे मार्गही गवसतील, असा विश्वास महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला. एसएनडीटी महिला विद्यापीठातर्फे आयोजित ‘इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन क्लायमेट चेंज–२०२५’चे गुरुवारी (दि. १६ जानेवारी २०२५) महामहीम राज्यपाल यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. या तीन दिवसीय संमेलनाला राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच एसएनडीटीच्या कुलगुरू डॉक्टर उज्वला चक्रदेव,आमदार देवराव भोंगळे, जलपुरुष राजेंद्रसिंह, एसएनडीटीचे विलास नानीवाडेकर, युएसचे कॉन्सिलेट जनरल सलील कादेर, कुणी युनिव्हर्सिटी न्यूयॉर्कचे प्राध्यापक नील फिलिप, प्रभारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, एसएनडीटी बल्लारपूर कॅम्पस संचालक राजेश इंगोले, मनपा आयुक्त विपिन पालीवाल, गोंडवानाचे कुलगुरू डॉ प्रशांत बोकारे आदींची यावेळी उपस्थिती होती.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन म्हणाले, ‘चंद्रपूरमध्ये होत असलेल्या परिषदेतून मोठी जनजागृती होईल असा मला विश्वास आहे. कुठलेही चांगले काम करण्यासाठी पहिले चांगली मानसिकता आणि मनाची तयारी आवश्यक असते. तसे असेल तर नक्कीच यश मिळते. कुणी एका रात्रीत जग बदलू शकत नाही. प्रत्येक छोटा प्रयत्न मोठ्या यशाच्या दिशेने सुरू झालेली वाटचाल असते. भविष्यातील पिढ्यांना सुरक्षित करण्यासाठी अविरत कष्ट करावे लागणार आहेत.’लोकसंख्या वाढत आहे आणि त्यानुसार गरजाही वाढत आहेत. आपण आधुनिकतेकडे वळतोय. पण त्याला मर्यादा असली पाहिजे. निसर्गाने दिलेल्या संसाधनांचा वापर वाढल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. पाण्याची बचत आणि वृक्षांचे रक्षण या पर्यावरणाचे संवर्धन अवलंबून आहे. आपण या दोन्हींकडे दुर्लक्ष करता कामा नये,’ असेही राज्यपाल महोदय म्हणाले.

### पर्यावरण संवर्धन हे लोकआंदोलन व्हावे

पर्यावरण संवर्धनाचा विषय चंद्रपूरच्या चर्चेपर्यंत राहणार नाही. याचे रुपांतर लोकआंदोलनात होईल, असा मला विश्वास आहे. मी महाराष्ट्रात ५० कोटी वृक्ष लावले, त्याचा परिणाम आज बघायला मिळतोय. फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया मध्ये राज्याचे ग्रीन कव्हर २ हजार ५५० चौरस किलोमीटर वाढल्याचे सांगण्यात आले आहे. महाराष्ट्रात मँग्रोव्ह (कांदळवन)चे क्षेत्र वाढले आहे. पर्यावरण संवर्धनासाठी असेच प्रयत्न आवश्यक आहे. भविष्यात मी याच विषयाला घेऊन पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे, असेही आ. मुनगंटीवार म्हणाले.

### ‘खूप झाल्या चर्चा; आता कृती हवी’

या परिषदेत फक्त भाषण ऐकण्याचे काम होऊ नये. चर्चा आणि संवाद होईल. चिंता व्यक्त होईल. पण केवळ त्यापुरती ही परिषद मर्यादित राहू नये, असा माझा आग्रह आहे. तीन दिवस चर्चा अवश्य करा. पण ज्ञान पुस्तकात बंद असेल तर त्याचा उपयोग नसतो. क्लायमेट चेंजवरही आजवर खूप परिषदा झाल्या. पण अंमलबजावणी होत नाही. आपल्याला कृती करायची आहे आणि उपायांवर अंमलबजावणीही करायची आहे, असे आवाहन आ. मुनगंटीवार यांनी केले. जेणेकरून जेव्हा क्लायमेट चेंजचा इतिहास लिहिला जाईल, तेंव्हा त्यात चंद्रपूरचे नाव असले पाहिजे असेही ते म्हणाले.

### आ.सुधीर मुनगंटीवार यांनी दिली त्रिसूत्री

पर्यावरण संवर्धनासाठी लोकशिक्षण, संशोधन, अंमलबजावणी हीच त्रिसूत्री असल्याचे प्रतिपादन आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. ते म्हणाले, ‘यंदा संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. संविधानाने आपल्याला दिलेले हक्क सर्वांना माहिती आहेत. पण संविधानाने दिलेल्या जबाबदारीचा, आपल्याला सांगितलेल्या कर्तव्यांचा विसर पडला आहे. तीन दिवसांच्या परिषदेत पर्यावरण संवर्धनाच्या कर्तव्यावर चर्चा होईल असा विश्वास आहे. त्यासाठी लोकशिक्षण, संशोधन, कृती आणि अंमलबजावणी यावर भर दिला पाहिजे.’ सी फॉर चंद्रपूर, सी फॉर क्लायमेट चेंजच्या युद्धात सर्वांत आघाडीवर राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# शेत वहीवाटीमध्ये वाहन वापरानुसार रस्ता:मार्गदर्शक सूचना जाहीर करा

## महसूल मंत्री बावनकुळेंचे निर्देश

**मुंबई (वृत्तसंस्था)**–यांत्रिकीकरणामुळे सध्या शेत वहीवाटीमध्ये मोठ्या वाहनांचा वापर होत असल्याने वाहन प्रकारानुसार शेत जमीन वहिवाट रस्ता बनवण्याबाबत तहसीलदारांना निर्णय घेता यावा यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात याव्यात, अशा सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या. शेतजमिनीच्या खरेदी विक्रीच्या दस्त नोंदणी मध्ये शेत रस्त्याचा समावेश बंधनकारक करणे व शेत रस्त्यांच्या नोंदणी ७/१२ इतर हक्कात करण्याबाबत महसूल मंत्री यांच्या दालनात बैठक झाली. वित्त नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय आणि कामगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार



अभिमन्यू पवार, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेशकुमार, सहसचिव अजित देशमुख यावेळी उपस्थित होते.०महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, शासनाने शेत रस्त्यांचे वर्गीकरण केले आहे. त्यानुसार जे रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेतजमीनमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होऊन तक्रारही होतात. शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. त्यानंतर त्यावर थेट अपील उच्च न्यायालयात केले जाते. थेट अपील होण्यापूर्वी अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करता यावे यासाठी एक स्टेप मध्ये असणे आवश्यक असून त्यानुसार नियमात सुधारणा करण्यात याव्यात अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# राज्यातील ९० टक्के पोलिस फुटलेल्या लोकांच्या सुरक्षेसाठी– संजय राऊत

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यातील ९० टक्के पोलिस फुटलेल्या लोकांच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आले आहे. मुंबईपासून बीडपर्यंत कुठेही कोणीची सुरक्षित नाही. राज्यात कायदा–सुव्यवस्था दिसून येत नाही, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, राज्यातील सरकार हे सभा, मेळाव्यामध्ये व्यस्त आहे. राज्यात काय सुरू आहे याचा गृहमंत्र्यांनी विचार करायला हवा. महायुतीचा मेळावा जर नौदलाच्या सभागृहात झाला असेल ही गोष्ट गंभीर आहे. नौदलाच्या जागेत आम्हाला मेळावा घेण्याची संधी मिळेल का ?, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

संजय राऊत म्हणाले की, गेल्या ३ वर्षांपासून राज्यात कायदा आणि सुव्यवस्था वाऱ्यावर आहे. सरकार सभा, मेळावे, पंतप्रधानांचे स्वागत, शिबिरं यांच्यात व्यस्त आहे. यामुळे राज्यात कायदा अन् सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्र सामान्य जनतेला सुरक्षा नाहीच .बँक, रस्ते, चाळ, घर, झोपड्यांमध्ये दरोडेखोर घुसताय. पण आता सुरक्षा असणारे कलाकारही सुरक्षित राहिले नाही.

संजय राऊत म्हणाले की, सैफअली खान हा मोठा कलाकार आहे.काल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी मुंबईत होते त्यामुळे सर्व पोलिस तिकडे असतील. पीएम जरी मुंबईत असतील तरी राज्यात काय सुरू आहे हा प्रश्न गृहमंत्र्यांनी स्वत:ला विचारायला हवा. आम्ही त्यांना काही म्हटलो तर त्यांना वेदना होतात. सैफअली खान यांच्यावर झालेला हा हल्ला खरं तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धक्का आहे. कारण १५ दिवसांपूर्वी सैफअली खान यांनी पीएम नरेंद्र मोदीची भेट घेतली होती.संजय राऊत म्हणाले की, राज्यातील ९० टक्के पोलिस हे महायुतीच्या लोकांच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आले आहे. गद्दार, बिल्डर, यांना पूर्ण सुरक्षा आहे. पण सामान्य माणसाला कोणतीही सुरक्षा नाही. सैफ अली खान यांना सुरक्षा असणारच, त्यांना भारत सरकारने पद्मश्री दिला आहे. तेही मुंबईत सुरक्षित राहत नाही.संजय राऊत म्हणाले की, नागपूरमध्ये १०० पेक्षा महिलांवर अत्याचार झाले तेव्हा पोलिस काय करत होते. गेली ३ ते ४ वर्षे देवेंद्र फडणवीस राज्याचे गृहमंत्री आहेत त्यांनी यावर बोलायला हवे.संजय राऊत म्हणाले की, वाल्मीक कराड यांची संतोष देशमुख हत्या प्रकरणी चौकशी व्हावी, त्याला मकोका लागावा अशी लोकांची मागणी होती, आणि ती पूर्ण झाली आहे. या प्रकरणी तपासात अडथळे येईल असे काही बोलणे योग्य नाही.संजय राऊत म्हणाले की, आपली प्रतिमा जपा असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. ज्या लोकांवर त्यांनी स्वत: आरोप केला ते आता आमदारांना सांगत आहे की आपल्या प्रतिमेला जपा असे म्हणत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टोला लगावला आहे.

## देशातल्या मेगा सिटीमध्ये मुंबई सर्वात सुरक्षित

# सुरक्षेच्या दृष्टीने अधिक प्रयत्न करू, सैफवरील हल्ल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीसांची प्रतिक्रिया



**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुंबईमध्ये अभिनेता सैफ आली खानवर घरात घुसून हल्ला झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेवरून मुंबई असुरक्षित असल्याचे म्हणत विरोधकांनी सरकारवर टीका करण्यास सुरुवात केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांनी या घटनेवरून गृहमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. यावर देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.अभिनेता सैफ आली खानवर झालेल्या हल्याबद्दल माहिती देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, पोलिसांनी त्या संदर्भातली सगळी माहिती आपल्याला दिलेली आहे. या हल्ल्यामागे कशा प्रकारचा मोटिव्ह असू शकतो हे देखील त्यांनी सांगितले आहे, ते कुठून आले या सगळ्याची माहिती पोलिसांनी सांगितली आहे आणि त्याचा तपास सुरू आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मला असे वाटते देशातल्या मेगा सिटीमध्ये सर्वात सुरक्षित मुंबई आहे. हे खरे आहे की कधी कधी काही घटना घडतात त्याला गंभीरतेने देखील घेतले पाहिजे. पण, तेव्हा त्या घटनांमुळे मुंबई असुरक्षित आहे असे म्हणणे यासाठी योग्य होणार नाही की याने मुंबईची प्रतिमा देखील खराब होते. पण, अत्याधिक सुरक्षित राहिले पाहिजे या दृष्टीने सरकार नक्की प्रयत्न करेल, असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. दरम्यान, बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर बुधवारी रात्री अडीच वाजता मुंबईतील खार येथील त्याच्या घरी चाकूने हल्ला करण्यात आला. सैफच्या मानेवर, पाठीवर, हातावर आणि डोक्यावर चाकू आहे. सैफला रात्री ३.३० वाजता लीलावती रुग्णालयात आणण्यात आले. जिथे त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली.सैफ अली खान यांच्यावर हल्ला प्रकरणाचा तपास आता गुन्हे शाखेकडे देण्यात आला आहे. मुंबई गुन्हे शाखेचे अधिकारी सैफ अली खान यांच्या घरी दाखल झाले असून त्यांच्याकडून कसून तपास करण्यात येत आहे.

# राष्ट्रीय बंजारा एकता संमेलनात समाजसेवकांचा गौरव राष्ट्रसंत डॉ.रामराव महाराज प्रेरणा पुरस्कार २०२५ प्रदान

**उमरखेड । प्रतिनिधी**

धर्मगुरू तपस्वी संत डॉ. रामराव महाराज बंजारा समाज विकास फेडरेशन भारत तर्फे आयोजित राष्ट्रीय बंजारा एकता संमेलनात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजसेवकांचा भव्य सन्मान करण्यात आला. हा विशेष कार्यक्रम पवित्र तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथे संपन्न झाला. यावेळी सामाजीक क्षेत्रात अतुलनीय योगदान देणाऱ्या व समाजसेवेत निःस्वार्थपणे झटणाऱ्या व्यक्तींना 'राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज प्रेरणा पुरस्कार २०२५' ने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात संत सेवालाल महाराज आणि डॉ. रामराव बापू यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. या ऐतिहासिक क्षणाचे अध्यक्षस्थान धर्मगुरू व विधान परिषद सदस्य आमदार डॉ. बाबूसिंग महाराज पोहरादेवी यांनी भूषवले. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून महंत जितेंद्र महाराज, महंत कबीरदास महाराज,




महंत यशवंत महाराज, प्रबोधनकार पंकज पाल महाराज, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष धुमाळ साहेब, साहित्यिक पंजाब चव्हाण, राष्ट्रीय प्रचारक विजय राठोड, तसेच लक्ष्मण राठोड आणि इतर साधू-संत, महंत व मान्यवर उपस्थित होते.

या सन्मानाने बंजारा समाज विकास फेडरेशनने समाजासाठी आपले योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या सेवेला सलाम केला. राष्ट्रीय प्रचारक विजय राठोड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना फेडरेशनचे उद्दिष्ट, ध्येय आणि कार्यप्रणाली यावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी फेडरेशनच्या विविध योजनांचा परिचय देऊन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी फेडरेशन घेत असलेल्या पुढाकाराचे महत्त्व अधोरेखित केले.

आरोग्य, शिक्षण, समाजसेवा आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना यावेळी गौरविण्यात आले. त्यामध्ये समाजसेवकांना सामाजीक कार्यात अतुलनीय योगदानाबद्दल राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराने त्यांची सेवा, समर्पण आणि मेहनतीचा गौरव झाला असून, समाजामध्ये त्यांच्या कार्याचा आदर्श निर्माण झाला आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन साहेबराव राठोड यांनी केले. संमेलन यशस्वी करण्यासाठी बंजारा समाज विकास फेडरेशनच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाने बंजारा समाजाचा एकात्मतेचा संदेश दिला तसेच समाजाच्या प्रगतीसाठी फेडरेशनच्या कार्याची नवी दिशा स्पष्ट केली.

समाजसेवकांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या पुरस्कारामुळे समाजसेवेसाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांना नवी प्रेरणा मिळेल आणि बंजारा समाज विकास फेडरेशनचा उद्देश अधिक व्यापक होईल, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

बंजारा समाज विकास फेडरेशन यापुढेही समाजाच्या प्रगतीसाठी आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी प्रयत्नशील राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आह

# पानखेडा येथे ३२ वे आदिवासी सांस्कृतिक एकता महासंमेलन उत्साहात पार पडल

**धुळे । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील पिंपळनेरजवळील पानखेडा येथे १३ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान ३२ वे आदिवासी सांस्कृतिक एकता महासंमेलन उत्साहात पार पडले. या महासंमेलनाला देश-विदेशातील लाखो आदिवासी बांधवांनी उपस्थिती लावली.

महासंमेलनाच्या पहिल्या दिवशी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. आदिवासी परंपरा आणि संस्कृतीचे दर्शन घडवणारे नृत्य, गाणी आणि प्रदर्शनांनी संमेलनाला रंगत आणली. याठिकाणी आदिवासी परंपरेतील कपडे, आयुर्वेदिक औषधे, हस्तकलेच्या वस्तू, तसेच नागली, तांदूळ, ज्वारीच्या भाकरींचे स्टॉल्स उभारण्यात आले होते. याशिवाय आदिवासी संस्कृतीची झोपडी आणि कला हे कार्यक्रम विशेष आकर्षण ठरले.

महासंमेलनाच्या काळात साक्री तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय पथक तीन दिवस तैनात होते. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांच्या



मार्गदर्शनाखाली आरोग्य सेवांची प्रभावी व्यवस्था करण्यात आली. या पथकात डॉ. हितेंद्र गायकवाड (तालुका वैद्यकीय अधिकारी, साक्री), डॉ. मनिष जयराम सूर्यवंशी (वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, रोहोड), डॉ. जे. जी. बहिरम (वैद्यकीय अधिकारी, कुडाशी), डॉ. प्रेमराज चव्हाण (कुडाशी), डॉ. भुषण पाटील (कासारे), डॉ. दीपक निकम, आर. बी. आजगे (सामूहिक आरोग्य अधिकारी), तसेच फार्मसी अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेविका, परिचर आणि ॲम्बुलन्स चालक यांचा समावेश होता. चार ते पाच ॲम्बुलन्स तत्पर होत्या.

पिंपळनेर पोलीस स्टेशनच्या वतीने संपूर्ण महासंमेलन स्थळी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यामुळे कार्यक्रम सुरळीत पार पडला.


महासंमेलनाने आदिवासी संस्कृतीचे वैभव आणि एकतेचे दर्शन घडवून दिले. कार्यक्रमाला आदिवासी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून उत्सवाला यश मिळवून दिले.

# शेतकऱ्यांचे आंदोलन टोकाला;पाण्याच्या टाकीवर चढून आत्मदहनाचा इशारा

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील बाजार समितीमधील शेतकरी आंदोलनाने गंभीर वळण घेतले असून, पैसे परत न मिळालेल्या शेतकऱ्यांनी पाण्याच्या टाकीवर चढून सामूहिक आत्मदहनाचा इशारा दिला आहे.

सागर राजपूत नावाच्या व्यापाऱ्याने ४०६ शेतकऱ्यांकडून दोन कोटींपेक्षा अधिक रक्कम घेतली आणि फरार झाला होता. वैजापूर पोलिसांनी त्याला सोलापूर येथून अटक करून आणले, मात्र अजूनही शेतकऱ्यांना त्यांच्या थकित रकमेची परतफेड करण्यात आलेली नाही.



बाजार समितीचे सभापती आणि आमदार रमेश पाटील बोरणारे यांनी मध्यस्थी करत शेतकऱ्यांना हमी दिली होती की, एकाही शेतकऱ्याचे पैसे बुडणार नाहीत. मात्र, तीन महिने उलटूनही शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाले नाहीत.

त्यानंतर शेतकऱ्यांनी बाजार समितीसमोर आंदोलन केले, परंतु याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने शेतकऱ्यांनी आमरण उपोषण सुरू केले. उपोषणाला पाच-सहा दिवस उलटूनही एकाही लोकप्रतिनिधीने शेतकऱ्यांच्या अडचणींवर चर्चा केलेली नाही.

यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी अखेर पाण्याच्या टाकीवर चढून आत्मदहनाचा इशारा दिला. आमच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, तर आम्ही पाण्याच्या टाकीवरून उड्या मारून जीव देऊ, अशी भूमिका शेतकऱ्यांनी मांडली आहे.

निवडणुकीच्या वेळी नेते मंडळी आमच्या बांधावर येऊन मतं मागतात; आता हे नेते कुठे आहेत? असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

शेतकऱ्यांचा आत्मदहनाचा इशारा प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना जागे करणारा आहे. या परिस्थितीवर तात्काळ तोडगा निघाला नाही, तर परिस्थिती गंभीर वळण घेऊ शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

# गोंडवाना विद्यापीठातील युगनायक स्वामी विवेकानंद केंद्राचे भव्य उद्घाटन

**गोंडवाना । प्रतिनिधी**

जीवनांत यशस्वी होण्यासाठी अंतःकरणाचे पावित्र्य, मनाचा संयम आणि कार्यातील दिर्धोद्योग अत्यंत आवश्यक आहे. आपली कूपमंडुकवृत्ती टाकून उदारपणे दुसऱ्यांतिल चांगले, घेण्याची मानसिकताच आपल्याला समृद्ध करू शकते. असे प्रतिपादन नागपूर येथील रामकृष्ण मठाचे अध्यक्ष स्वामी राघवेंद्रानंद यांनी केले.

युगनायक स्वामी विवेकानंद केंद्राचा उद्घाटन समारंभ १४ जानेवारी २०२४ रोजी गोंडवाना विद्यापीठात मोठ्या थाटामाटात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी भूषवले तर प्रमुख वक्ते आणि उद्घाटक रामकृष्ण मिशन, नागपूरचे अध्यक्ष स्वामी राघवेंद्रानंदजी होते.

स्वामी राघवेंद्रानंदजींनी त्यांच्या भाषणात स्वामी विवेकानंदांचे विचार सखोलपणे स्पष्ट केले. ते म्हणाले की, स्वामी विवेकानंदांचे लेखन वाचल्यानंतर असे वाटते की ते थेट आपल्याशी बोलत आहेत. प्रत्येक जीव हा दिव्य आहे आणि प्रत्येकाचे एकमेव कर्तव्य म्हणजे त्यांचे दिव्यत्व प्राप्त



करणे हे आहे यावर त्यांनी भर दिला. स्वामी विवेकानंदांचे ध्येय शिवभावाने सजीवांची सेवा करणे होते. त्यांनी असेही म्हटले की सत्य एक आहे, ते फक्त वेगवेगळ्या प्रकारे व्यक्त होते. स्वामीजींनी तरुणांना एकाग्रतेने शिकण्याचे महत्त्व सांगितले आणि विचार आणि कृतीचे स्वातंत्र्य हे विद्वत्तेचे वैशिष्ट्य असल्याचे सांगितले. त्यांनी तरुणांना अशी पावले उचलण्याचे आवाहन केले जे त्यांच्या ध्येयांना कृतीत रूपांतरित करतील.

स्वामीजी म्हणाले जगातील सर्व मानवमात्रांचे तसेच सर्व धर्माचे वेगळेपण नौरींष्ट्यपूर्ण असून प्रत्येकाकडून काहीतरी चांगले घेण्यासारखे असते. त्यासाठी औदार्य आणि आत्मीयता असायला हवी. स्वामी विवेकानंदाचा ध्येय सिध्दीचा मंत्र आत्मसात केल्यास तरुणांना आपले शासित गाठता येईलउद्घाटन समारंभानंतर, राधिका क्रिएशन्स निर्मित स्वामी विवेकानंदांच्या जीवनावर आधारित नाटक सादर करण्यात आले. नाटकाला खुद्द स्वामीजी उपस्थित होते. प्रेक्षकांना हे नाटक खूप आवडले. या नाटकाचे लेखिका शुभांगी भडभडे, सूत्रधार संजय पेंडसे आणि निर्देशिका सारिका पेंडसे होती. या कार्यक्रमात विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कवळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्राचार्य दिनकर वाकडे, व्यवस्थापन परिषद सदस्य व प्रस्तावक श्री प्रशांत दोंतुलवार आणि श्री संजय गोरे यांच्यासोबत व्यवस्थापन परिषद आणि अधिसभेतील अनेक सदस्यांनीही कार्यक्रमात आपली उपस्थिती नोंदवली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भौतिकशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक विकास पुनसे यांनी केले तर आभार केंद्र समन्वयक डॉ. अपर्णा भाके यांनी मानले. या केंद्राच्या बोधचिन्ह स्पर्धेत विजेते भोजराज सातपुते, वैशाली धोंडरे आणि उत्कर्ष नागापूरे यांनाही अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवल्याबद्दल परितोषिक आणि सन्मान देण्यात आले. हे केंद्र स्वामी विवेकानंदांचे विचार तरुण पिढीपर्यंत पोहोचवण्याचा एक प्रशंसनीय प्रयत्न आहे.

# वर्धा एमआयडीसी पुन्हा नागपूर कार्यालयाशी संलग्न

**आर्वी । प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्याच्या एमआयडीसीचे नागपूर येथील प्रादेशिक कार्यालयाशी पुन्हा जोडण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी चंद्रपूर प्रादेशिक कार्यालयाशी जोडले गेल्याने वर्धा जिल्ह्यातील उद्योग विकासात अडथळा निर्माण झाला होता. आमदार सुमित वानखेडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे थेट मागणी करत तसेच नागपूर अधिवेशनात हा मुद्दा मांडून वर्धा जिल्ह्यासाठी नागपूर प्रादेशिक कार्यालयाशी संबंध कायम ठेवण्याचा आग्रह धरला. त्यांच्या मागणीला यश मिळाले असून आता वर्धा एमआयडीसी नागपूर कार्यालयाशीच संलग्न राहील, असा आदेश जारी करण्यात आला आहे.

चंद्रपूर प्रादेशिक कार्यालय वर्धा जिल्ह्यासाठी भौगोलिकदृष्ट्या असुविधाजनक असल्याचे लक्षात घेऊन हा निर्णय घेतला गेला. आर्वी मतदारसंघातील साहूरयसारख्या दुर्गम भागातील छोट्या उद्योजकांना चंद्रपूरला जाऊन कामकाज करणे खर्चिक आणि वेळखाऊ ठरत होते. नागपूर कार्यालयाशी संलग्नतेमुळे वर्धा, कारंजा, आणि आर्वी येथील एमआयडीसी विकासाला नवा गती मिळणार आहे.

आमदार सुमित वानखेडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन चंद्रपूर कार्यालयाशी जोडण्याच्या निर्णयातील त्रुटींचा उल्लेख केला. तसेच हिवाळी अधिवेशनात प्रभावीपणे हा मुद्दा मांडून हा निर्णय बदलण्याचा आग्रह धरला.



त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे वर्धा जिल्ह्याला नागपूर प्रादेशिक कार्यालयाशी पुन्हा जोडले गेले आहे.या निर्णयामुळे वर्धा जिल्ह्यातील उद्योगक्षेत्राला आधार मिळणार आहे. कारंजा आणि आर्वी येथील एमआयडीसी प्रकल्पांचा वेग वाढणार असून उद्योजकांनी आमदार वानखेडे यांचे आभार मानले आहेत. आमदार वानखेडे यांनीही मुख्यमंत्री फडणवीस यांचे विशेष आभार मानले आहेत.

## भाजपा युवा मोर्चाच्या मागणीला यश

# नागरी रेल्वे स्टेशनवरील सुधारणा कामांना मंजुरी

**नागरी । प्रतिनिधी**

नागरी रेल्वे स्टेशनवरील प्लॅटफॉर्मची उंची वाढवणे, क्लिनिंग व प्लॅटफॉर्म दुरुस्ती यांसारख्या सुधारणा कामांना मंजुरी मिळाली आहे. भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष सुरज धात्रक यांच्या नेतृत्वाखाली ही मागणी करण्यात आली होती.



दिनांक २ ऑगस्ट २०२४ रोजी नागरी येथे भाजप युवा मोर्चाच्या वतीने रेल्वे स्टेशन प्रबंधक आणि रेल्वे अधिकाऱ्यांची भेट घेऊन नागरी रेल्वे स्टेशनवरील समस्यांवर चर्चा करण्यात आली. सुरज धात्रक, मोर्चाचे सचिव पवन डांगरे, तुषार बावणे आणि युवा मोर्चाचे सदस्य यांनी नागरी रेल्वे स्टेशनवरील असुविधांबाबत सविस्तर निवेदन सादर केले.नागरी स्टेशनवरून वरोरा, चंद्रपूर, हिंगणघाट आणि वर्धा येथे दररोज शेकडो प्रवासी ये-जा करतात. मात्र, प्लॅटफॉर्मची खराब अवस्था, उंची कमी असणे, आणि प्रवाशांना स्टेशनवर येण्या-जाण्यासाठी सोयीचा मार्ग नसणे यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.

भाजप युवा मोर्चाच्या वतीने या समस्या तातडीने सोडवाव्यात अशी मागणी करण्यात आली होती. या मागणीनुसार काही कामांना मंजुरी मिळाली असून त्यातील कामे मार्गी लागली आहेत. भाजपा युवा मोर्चाने यावेळी माजी केंद्रीय मंत्री हंसराज भैय्या अहिर आणि रेल्वे अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत. या कामामुळे नागरी रेल्वे स्टेशनवरील सुविधांमध्ये सुधारणा होऊन प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. सुरज धात्रक यांच्या नेतृत्वाखाली नागरी येथील समस्यांवर काम होण्याच्या दृष्टीने युवा मोर्चाने दाखवलेल्या पुढाकारामुळे प्रवाशांच्या गरजा आणि मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

# अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवणाऱ्या दोघांना वडुज पोलिसांनी घेतले ताब्यात

**सातारा । प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेणाऱ्या दोघांना वडुज पोलिसांनी अटक केली आहे. या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, दोन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये ही कारवाई करण्यात आली आहे.

पहिल्या प्रकरणात, दिनांक ११ जानेवारी रोजी एका अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याची तक्रार पीडित मुलीच्या नातेवाईकांनी वडुज पोलीस ठाण्यात नोंदवली होती. या प्रकरणी पोलिसांनी संशयित ज्ञानेश्वर प्रल्हाद नामदास (वय २१, राहणार सातेवाडी, तालुका खटाव) याला शिंदेवाडी, नातेपुते (तालुका माळशिरस) येथून दिनांक १४ जानेवारी रोजी ताब्यात घेतले.

दुसऱ्या प्रकरणात, दिनांक १२ जानेवारी रोजी एका अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची फिर्याद मुलीच्या कुटुंबीयांनी दिली होती. या प्रकरणात पोलिसांनी संशयित अमोल आप्पासाहेब बडे (राहणार केकत जळगाव, तालुका पैठण, जिल्हा छत्रपती संभाजीनगर) याला अटक केली आहे.

दोन्ही प्रकरणांमध्ये पोलिसांनी संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून अधिक तपास वडुज पोलीस करत आहेत. या कारवाईमुळे अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाच्या तत्परतेचे कौतुक होत आह

# अल्पवयीन मुलीवर खाजगी बस चालकाचा अत्याचार;दोघांना अटक

**सातारा । प्रतिनिधी**

साताऱ्यात खाजगी बस चालकाने अल्पवयीन शाळकरी मुलीवर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, पोलिसांनी मुख्य आरोपी नितीन राजाराम पवार (वय २८, राहणार पाटखळ माथा, सातारा) आणि त्याचा साथीदार पुष्कर कांबळे (राहणार सदरबझार, सातारा) यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

नितीन पवार हा खाजगी शाळा बस चालक असून, तो मुलांना दररोज शाळेत ने-आण करीत असे. याच दरम्यान, त्याने अल्पवयीन मुलीसोबत ओळख वाढवून तिच्यावर विश्वास निर्माण केला. ऑक्टोबर महिन्यात, नितीनने मुलीला पुष्कर कांबळे याच्या सदरबझार येथील घरी नेले आणि तेथे तिच्यावर अत्याचार केला.

यावेळी आरोपींनी पीडितेचे छायाचित्रेही काढली, ज्यामुळे पीडित मुलगी अधिकच घाबरली आणि तिने ही घटना कुटुंबीयांना सांगण्याचे टाळले. काही दिवसांपासून मुलगी अबोल आणि घाबरलेली असल्याचे लक्षात आल्यावर आईने तिला विश्वासात घेऊन विचारणा केली. त्यावेळी मुलीने घडलेली संपूर्ण घटना सांगितली.

घडलेला प्रकार समजताच कुटुंबीयांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलीस निरीक्षक राजेंद्र म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली महिला पोलिस अधिकाऱ्यांनी मुलीकडून माहिती घेतली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोक्सो कायद्यांतर्गत नितीन पवार आणि पुष्कर कांबळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. दोघांना रात्री उशिरा अटक करण्यात आली.

या प्रकारामुळे पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, शाळकरी मुलांच्या विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पालकांनी या घटनेचा निषेध करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे

## अनिल नखाते यांनी बाजार समिती सभापतीपदाचा कार्यभार स्विकारला

# आ.राजेशदादा विटेकर,माजी आ.हरिभाऊ लहाने यांच्यासह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

**पाथरी । लक्ष्मण उजगरे**



छत्रपती संभाजी नगरचे विभागीय सहनिबंधक शरद जरे यांनी ३१ डिसेंबर रोजी दिलेल्या निर्णयानुसार गुरूवारी पाथरी बाजार समितीत सभापतीपदाचा कार्यभार अनिल नखाते यांनी आमदार राजेशदादा विटेकर, माजी आ. हरिभाऊ लहाने यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत स्विकारला. या निर्णयामुळे पाथरी बाजार समितीत अडीच महिन्यांपासून सुरू असलेल्या घडामोडीवर पडदा पडला. जुन्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र बाजार समितीच्या २०१७ च्या नियम १० (१) नुसार अनिल नखाते यांना उपजिल्हा निबंधक संजय भालेराव यांनी १० ऑक्टोबर २०२४ रोजी संचालक म्हणून अपात्र घोषित केले होते. या निर्णयाचा आदर करत नखाते यांनी सभापतीपदावरून पायउतार केले. तथापि, नखाते यांनी या निर्णयाला कायदेशीर तरतुदीनुसार १६ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय सहनिबंधकांकडे आव्हान दिले. न्यायनिवाड्यादरम्यान वादी व प्रतिवादी यांना त्यांच्या म्हणण्यांची योग्य संधी देण्यात आली होती. या प्रकरणात छत्रपती संभाजी नगरचे विभागीय सहनिबंधक शरद जरे यांनी ३१ डिसेंबर रोजी दिलेल्या निर्णयात अनिल नखाते यांना संचालक म्हणून अपात्र ठरविणारा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था परभणी यांचा १४ ऑक्टोबर २०२४ चा आदेश रद्द केला. त्यानुसार, अनिल नखाते यांचे सभापतीपद कायम राखले गेले. गुरूवारी पाथरी बाजार समितीत राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) आमदार राजेशदादा विटेकर, शिवसेना (शिंदे) माजी आ. हरिभाऊ लहाने, सेलू येथील माजी नगरसेवक मिलींद सावंत, सुभाष आंबट, बाळासाहेब कोल्हे, गंगाधर गायकवाड, मानवतचे माजी नगराध्यक्ष डॉ. अंकुश लाड, मानवत बाजार समितीचे सभापती पंकज आंबेगावकर, माजी सभापती दादासाहेब टेंग्से, सुदाम साळवे, माधवराव जोगदंड, भगवान वडीकर यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अनिल नखाते यांनी सभापतीपदाचा कार्यभार स्वीकारला. या निर्णयाच्या अंमलबजावणीमुळे बाजार समिती परिसरात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर, आ. राजेशदादा विटेकर आणि माजी आ. हरिभाऊ लहाने यांनी सभापती अनिल नखाते यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# शासकीय रेखाकला परीक्षा पाथरे बु.विद्यालयाचा १००% निकाल

**राहुरी । प्रतिनिधी**



लोकनेते डॉक्टर बाळासाहेब विखे पाटील पद्मा भूषण उपाधीने सन्मानित प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था प्रवरानगर संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पाथरे बु. ता. राहाता, जि. अहिल्यानगर या विद्यालयाचा सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या शासकीय रेखाकाला ग्रेड परीक्षा-२०२४ एलेमेंटरी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून विद्यालयाचा निकाल शेकडा १०० % लागला आहे. या निकालामध्ये इ ग्रेड मध्ये ३ विद्यार्थी

अक्षदा अरविंद कोकणे,साक्षी अनिल कदम, श्रावणी विलास जेजुरकर या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले आहे. तर इंटरामिजिएट परीक्षेत - ग्रेड मिळालेले विद्यार्थी आदित्य संदीप कडू , कार्तिका विनोद विधाटे, दीक्षा भाऊसाहेब कडू, केतन विलास ब्राह्मणे, श्रुती सत्यजित घोलप इ ग्रेड मिळालेले विद्यार्थी

ओंकार चंद्रकांत कदम, प्रसाद दिलीप घोलप साक्षी दिनेश शिंदे, सानिका दिगबर फणसे

संकेत सुरेश कदम, सुरेंद्र परशराम देवतकर यश चंद्रकांत भोत यांनी प्राविण्य मिळविले आहे

परीक्षेचा निकाल १०० % टक्के लागला असून यामध्ये इयत्ता दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना इंटरमिजिएट परीक्षेचे वाढीव सवलतीचे गुण मिळणार आहेत या सर्व विद्यार्थ्यांना कलाशिक्षक कोऱ्हाळे सर, प्राचार्य बारगुजे सर, उपप्राचार्य वाणी मॅडम पर्यवेक्षक तांबे सर प्राथमिक चे मुख्याध्यापक घुगे सर व कनिष्ठ महाविद्यालयाचे इनचार्ज डॉ. म्हस्के सर यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व विद्यार्थ्यांचे लोकनेते डॉ बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधीने सन्मानित) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय नामदार राधाकृष्ण विखे पाटील (मंत्री, जलसंपदा महाराष्ट्र राज्य) अहिल्यानगर जि.प.च्या मा.अध्यक्ष सौ. शालिनीताई विखे पाटील, अहिल्यानगरचे माजी खासदार डॉ. सुजय दादा विखे पाटील,संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुस्मितताई विखे पाटील ,शिक्षण संचालिका, लीलावती सरोदे स्थानिक स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष आबासाहेब पा. घोलप ,सरपंच सर्व शिक्षक-शिक्षिका,पालक,ग्रामस्थ आदींनी अभिनंदन केले आहे

# विदर्भस्तरिय प्रो-कबड्डी स्पर्धेत नारंडा संघ प्रथम तर नकोडा उपविजेता

## खेळा दरम्यान माझी वसुंधरा ५.० योजनेची केली जनजागृती

**कोरपना । प्रतिनिधी**



कॅलिबर फाउंडेशन गडचांदूर व जय शिवशंकर क्रीडा मंडळ, बिबी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा स्मार्ट ग्राम बिबी येथे स्वर्गीय निवृत्ती ढवस यांच्या स्मरणार्थ विदर्भस्तरीय प्रो-कबड्डी सामन्यांचे नुकतेच आयोजन पार पडले. खेळादरम्यान आयोजकांनी ट्रॅक सूटवर लोगो काढून माझी वसुंधरा ५.० योजनेची जनजागृती केली.

स्पर्धेचे उद्घाटन माजी आमदार सुभाष धोटे यांच्या हस्ते पार पडले. अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे माजी सभापती साईनाथ कुळमेथे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक बावणे, व्यंकटेश बालसनिवार, सरपंच माधुरी टेकाम स्वागताध्यक्ष तथा उपसरपंच आशिष देरकर, कमलाबाई ढवस, पोलीस पाटील राहुल आसुटकर, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष स्वप्निल झुरमुरे, आनंदराव पावडे, रामदास देरकर, उत्तम काळे, देवराव ढेंगळे, सुमित्रा राजूरकर व इतर मान्यवर उपस्थित होते. संचालन कमलाकर देरकर यांनी केले.

सोमवारी बक्षीस वितरण करण्यात आले. स्पर्धेत प्रथम पारितोषिक आदर्श क्रीडा मंडळ नारंडा, द्वितीय पारितोषिक युवा सैनिक क्रीडा मंडळ नकोडा, तृतीय पारितोषिक जय जगनाथ क्रीडा मंडळ सांगोडा, चतुर्थ पारितोषिक जय जगनाथ क्रीडा मंडळ कढोली व पाचवे पारितोषिक जय बजरंग क्रीडा मंडळ, कारवाई यांनी पटकाविले.

वैयक्तिक बक्षिसांमध्ये बेस्ट रेडर संकेत लांडगे, बेस्ट पकड खुशाल घाटे, आवडता खेळाडू समीर वाडगुरे यांनी प्राप्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता अल्ट्राटेक सिमेंट वेल्फेअर फाउंडेशन, जयराम ढेंगळे, उदय काकडे, संतोष झुरमुरे, आकाश कोडापे, निखिल हेपट, प्रशांत वाघमारे, विकास कुळमेथे, सचिन मडावी, स्वप्निल वैद्य, आशिष पोईनकर, विठ्ठल आत्राम, अमोल आत्राम, दयाल आत्राम, सुरेश मडकाम, दीपक मडकाम, करण रासेकर, आर्यन कुडमेथे, प्रतीक टेकाम, तुषार निखाडे, अविनाश मट्टे, सोमेश्वर आत्राम, देवानंद माणूसमारे, साहिल शेख, सुनील कुडमेथे, कुणाल शिवणकर, गौरव मट्टे, रोशन हेपट, तोमेश देरकर, गौरव देरकर, नितेश आत्राम तसेच गावातील नागरिक व युवकांनी सहकार्य केले.

# निलज (लोखंडे वस्ती) येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील निलज येथील लोखंडे वस्ती येथे हभप कालिदास महाराज बोधले आणि हभप धनाजी महाराज लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माणिकराव महाराज कोळेकर यांच्या संकल्पनेतून सालाबादप्रमाणे यंदा तिसऱ्या वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा पवित्र सप्ताह रविवार, दिनांक १९ जानेवारी २०२५ पासून सुरू होऊन शनिवार, २५ जानेवारी २०२५ पर्यंत चालणार आहे. त्यानंतर रविवार, २६ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथपूजा व भव्यदिव्य ग्रंथ मिरवणूक काढण्यात येईल. त्याच दिवशी सकाळी १० वाजता हभप माणिकराव महाराज कोळेकर यांचे सुश्राव्य आणि सुमधुर काल्याचे कीर्तन होणार आहे. या सप्ताहात हभप दत्ता महाराज नंदरगे पोथरे, हभप लखन महाराज पवार हिवरवाडी, हभप मोहन महाराज कोकरवाडी, हभप अंजलीताई शिंदे पोथरे, हभप चंद्रकांत महाराज गिरी वीट, हभप विष्णू महाराज परदेशी कोरेगाव आणि हभप तुकाराम महाराज भारती जेकटेवाडी यांची कीर्तने होणार आहेत. तसेच हभप शरद दुधाळ, हभप तात्यासाहेब गायकवाड, हभप दिनेश किरवे, हभप बिरुदेव खरात, हभप धनंजय शेळके, हभप महेश नलवडे, हभप रामकृष्ण रंदवे आणि हभप महेश रजपूत यांची प्रवचने होणार आहेत.

सप्ताहाच्या प्रत्येक दिवशी पहाटे ४ ते ६ काकड आरती, सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ संत बाळू मामा विजयी ग्रंथ वाचन, दुपारी ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ७ पूजा व आरती, रात्री ८ ते १० हरिकीर्तन आणि महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यासाठी तात्यासाहेब लोखंडे व सूर्यभान वाघमोडे यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन माजी पोलीस उपनिरीक्षक प्रल्हाद लोखंडे, पोलिस मुख्यालय अधीक्षक गहिनीनाथ वाघमोडे, पोलीस नानासाहेब वाघमोडे, औदुंबर लोखंडे, गोरखनाथ लोखंडे, शहाजी लोखंडे, राजेंद्र लोखंडे, शिवाजी लोखंडे आणि समस्त निलज ग्रामस्थांनी केले आहे. भाविकांनी या पवित्र सप्ताहाचे दर्शन घेऊन लाभ घ्यावा, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

# कैलाश सत्यार्थी चिल्ड्रेन्स फाउंडेशनच्या मदतीने डिजिटल साक्षरतेसाठी पुढाकार

**शिरूर । प्रतिनिधी**



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपरी दुमाला (ता. शिरूर) येथील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणासाठी सहाय्यभूत ठरणारे साहित्य कैलाश सत्यार्थी चिल्ड्रेन्स फाउंडेशनच्या वतीने नुकतेच प्रदान करण्यात आले. या उपक्रमामुळे डिजिटल साक्षरतेमध्ये गुणात्मक वाढ होईल, असे मत अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष व मुख्याध्यापक राहुल चातुर यांनी व्यक्त केले.

कैलाश सत्यार्थी चिल्ड्रेन्स फाउंडेशन गेल्या दोन वर्षांपासून शिरूर तालुक्यातील ४० गावांमध्ये बालमित्र ग्राम प्रकल्प यशस्वीपणे राबवत आहे. या प्रकल्पाअंतर्गत विद्यार्थ्यांना संगणक, प्रोजेक्टर, साउंड सिस्टिम यांसारखी डिजिटल सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे.

उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक सुभाष गतखाने, प्रोजेक्ट ऑफिसर अमोल राठोड, असिस्टंट प्रोजेक्ट ऑफिसर मयुरा दळवी, कम्युनिटी सोशल वर्कर निंबाजी नरवडे, प्रतिनिधी गणेश जांमोडकर आणि स्वाती थोरात यांनी विशेष प्रयत्न केले.

या उपक्रमामुळे लाभलेल्या मदतीबद्दल पिंपरी दुमाला गावचे सरपंच महेंद्र डोळस, उपसरपंच निकिता खेडकर, शाळा समिती अध्यक्ष शशिकांत चिखले, उपाध्यक्ष वर्षा खळदकर यांनी फाउंडेशनचे आभार मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तंत्रस्नेही शिक्षक कांताराम शिंदे यांनी केले.या उपक्रमामुळे डिजिटल साक्षरतेचा पाया अधिक मजबूत होईल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

# श्री मुलिकादेवी विद्यालयात नाटिकेतून प्लॅस्टिक मुक्तीसाठी जनजागृती

**पारनेर । सुयश नरसाळे**



स्वच्छ भारत अभियानाचा एक भाग म्हणून अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे निघोज ता.पारनेर येथिल श्री मुलिकादेवी विद्या मंदिर विद्यालयात विद्यार्थ्यांनी प्रसिद्ध लेखिका प्रभा बैकर यांच्या साहित्यातील मला बाजारला जायाचं बाई! नाटिका सादर करुन प्लॅस्टिक टाळा, पृथ्वी वाचवा!असा बहुमोल संदेश दिप्लॅस्टिक प्रदुषणाबाबत जनजागृती करण्यासाठी श्री मुलिकादेवी विद्या मंदिर निघोज विद्यालयात इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी मला बाजारला जायाचं बाई! नाटिका सादर करुन माणसाने स्वतःच्या सुखसोईसाठी प्लॅस्टिक च्या विविध वस्तू बनविल्या त्यांच्या अतिवापरामुळे जनावरांचे मृत्यू,पर्यावरणाचा होणारा ऱ्हास असे भयवाह परिणाम दिसू लागले आहे.हे घडू नये यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे जनजागृतीसाठी नाटिकेतून मार्मिकपणे भारुडाच्या अंगाने जाणाऱ्या नाटिकेतून विद्यार्थ्यांनी सादर करून प्लॅस्टिक टाळा,पृथ्वी वाचवा! कागद कापडाच्या पिशव्या वापरा .असा बहुमोल संदेश देवून पर्यावरणाचा ऱ्हास थांबवा अशी आर्त साद प्रेक्षकांना घातली. नाटिका सादरीकरणासाठी मराठी विषय शिक्षिका पी.आर लहारे यांचे मार्गदर्शन लाभले .नाटिकेत कु आर्या घोगरे,वेदिका लाळगे,पुनम लाळगे,मानसी वराळ,श्रध्दा डेरे,विराज वरखडे ,अनुज राय यांनी सहभाग घेतला. यावेळी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीम. मनिषा जगदाळे मॅडम, उपप्राचार्य के बी शिंदे सर, पर्यवेक्षक एस.एम इंगळे सर, मराठी विभागाचे पी.एस वराळ ,बी.एम सोनवणे,एस .एफ इनामदार, एस डी गुंजाळ,जी.एस बारामते,डी.एस ठवाळ,ए.ए हारदे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. प्राचार्या जगदाळे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सूत्रसंचालन दादा ठवाळ यांनी केले. आभार बी.एम शिंदे यांनी मानले.

# फसवणूक प्रकरणी साताऱ्यात तन्मय मंत्री यांच्यावर गुन्हा दाखल

**सातारा । प्रतिनिधी**

गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांच्या परतफेडीवरून फसवणूक केल्याप्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात तन्मय मंत्री (राहणार नगरपालिका शेजारी, सातारा) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार प्रल्हाद लक्ष्मण साळुंखे (राहणार आंबेघर, तालुका जावली) यांनी या प्रकरणी फिर्याद नोंदवली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रल्हाद साळुंखे यांचा मुलगा अमोल माने यांनी तन्मय मंत्री यांच्या कडे ३३ ग्रॅम सोने गहाण ठेवून काही रक्कम व्याजाने घेतली होती. साळुंखे यांनी कर्जाची परतफेड केल्यानंतर गहाण ठेवलेले सोन्याचे दागिने परत मागितले. मात्र, तन्मय मंत्री यांनी दागिने परत देण्यास नकार दिला. त्यांनी दिलेल्या पैशांवर दररोज १०,००० व्याज दिल्याशिवाय दागिने परत देणार नसल्याचे ठणकावले.

तक्रारीच्या आधारे सातारा शहर पोलिसांनी तन्मय मंत्री यांच्यावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे व्याजाने कर्ज घेणाऱ्यांना होणाऱ्या त्रासाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# महालगाव जिल्हा परिषद गटात गणेश दादा चव्हाण निवडणुकीच्या रिंगणात उतरणार?

**वैजापूर । प्रतिनिधी**

महालगाव जिल्हा परिषद गटात आगामी निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे महत्त्वाचे नेते गणेश दादा चव्हाण यांच्या उमेदवारीची शक्यता वर्तवली जात आहे. राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांचे खंदे समर्थक आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कैलास पाटील यांचे विश्वासू मानले जाणारे गणेश दादा चव्हाण यांनी गटात आपला प्रभाव निर्माण केला आहे.



सन २०१४ मध्ये गणेश दादा चव्हाण माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिगावकर यांचे निकटवर्तीय मानले जात होते. त्या काळात त्यांनी महालगाव गटात आपला मजबूत संपर्क तयार केला.

२०१४ च्या पंचायत समिती निवडणुकीत गणेश चव्हाण इच्छुक होते, मात्र त्यांनी अँड. प्रताप निंबाळकर यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आणण्यासाठी मोठा सहभाग घेतला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात तीन महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याचे संकेत दिले आहेत. यामुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे.

गणेश दादा चव्हाण यांनी महालगाव गटातून निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवली असून, त्यांचा नागमठाणसह गटातील सर्वच भागात दांडगा प्रभाव आहे. विशेषतः नागमठाण येथे ३००० मतदान आहे, जिथे त्यांनी मजबूत पकड ठेवली आहे.

गणेश दादा चव्हाण यांनी निवडणूक लढवून गटात विजय मिळवण्याचा आत्मविश्वास व्यक्त केला आहे. त्यांची उमेदवारी गटातील राजकीय समीकरणे बदलू शकते, असे मानले जात आहे. स्थानिक निवडणुकीत चव्हाण यांच्या राजकीय प्रवासाकडे सध्या सर्वांचे लक्ष लागले आहे

# २६ जानेवारीला कोकणातील किल्ले व निर्मनुष्य बेटांवर ध्वजारोहण

**रायगड । ज्ञानेश्वर वाणी**

कोकण किनारपट्टीवरील निर्मनुष्य बेटे आणि समुद्री किल्ल्यांवर २६ जानेवारीला ध्वजारोहण होणार आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या निर्देशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यात दहा ठिकाणी या निर्णयानुसार ध्वजारोहण केले जाणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी कोकण किनारपट्टीवर सागरी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मराठा आरमाराची उभारणी केली होती. याच हेतूने सागरी किल्ल्यांची उभारणी केली होती, ज्याचे ऐतिहासिक महत्त्व आजही अबाधित आहे. या किल्ल्यांमध्ये बहुतेक आजही भक्कम स्थितीत उभे आहेत.

२६ जानेवारीला कोकण किनारपट्टीवर एकूण ६२ ठिकाणी ध्वजारोहण होणार आहे. केंद्रीय गृहमंत्र्यांच्या निर्देशानुसार, सागरी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या बेटांवर नियमितपणे भेटी देऊन स्थितीचा आढावा घेण्याचे आणि वर्षातून किमान दोन वेळा ध्वजारोहण करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार प्रशासनाने जोरदार तयारी केली आहे. ज्या ठिकाणी पोहोचता येईल अशा ठिकाणी ध्वजारोहण करण्यात कुठलीही अडचण येणार नाही. मात्र, ज्या किल्ल्यांवर आणि बेटांवर कोणी जात नाही, अशा ठिकाणी पोहोचण्यास यंत्रणांसाठी आव्हान असू शकते. रायगड जिल्ह्यातील उंदेरी किल्ला हे उदाहरण घेतले जाऊ शकते, जिथे वर्षभरात कोणी जात नाही आणि बोटी लागण्यासाठी जेटी उपलब्ध नाही. पावसाळ्यात झुडपांचा मोठ्या प्रमाणावर उगवलेला अडथळा किल्ल्यावर साफसफाई करण्यासाठी प्रशासनासाठी चांगलीच कसरत ठरणार आहे.

# पक्ष प्रवेश कार्यक्रम राष्ट्रसेवेचा संकल्प मजबूत करण्याचा सोहळा-आ.जोरगेवार

## भारतीय जनता पक्षाच्या वतीने पक्ष प्रवेश कार्यक्रमाचे आयोजन

भारतीय जनता पक्ष हा देशाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करत आहे. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राज्य आणि देश विकासाच्या नवीन शिखरांवर पोहोचत आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे भारत जागतिक स्तरावर एका शक्तिशाली राष्ट्राच्या रूपात उभा आहे. यात कार्यकर्त्यांचीही महत्त्वाची भूमिका आहे. आपण पक्षाची खरी ताकद असून हा पक्ष प्रवेश कार्यक्रम राष्ट्रसेवेचा संकल्प मजबूत करण्याचा सोहळा असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.




भारतीय जनता पक्षाच्या वतीने पंचशील वॉर्ड येथे पक्ष प्रवेश कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला भारतीय युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष रघुवीर अहिर, विजय चंदावार, मंडळ अध्यक्ष रवी लोणकर, माजी नगरसेविका छबू वैरागडे, हेल्पिंग हॅन्ड चे अध्यक्ष अजय दुर्गे, अक्षय घोटेकर, सुनिल सुर्यवंशी, सोनु माहोरकर, राजु माहोरकर, सोनु रायपूरे, साहिल समुंद, राजू धनराज, चांद चिताडे, पराग मेलोडे, सुबोध चिकटे आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला अभूतपूर्व यश मिळाले आहे. नागरिकांना पक्षाचे विचार पटत असून हेच विचार पुढील काळात पुन्हा आपल्याला प्रत्येक घरी पोहोचवायचे आहेत. आजच्या पक्ष प्रवेश कार्यक्रमाने पक्षाची ताकद वाढणार आहे. सोबतच नवीन सदस्यांवरही आता पक्षवाढीसाठी काम करण्याची जबाबदारी असणार आहे. या पाच वर्षांत अनेक विकासकामे आपल्याला करायची आहेत. ही करत असताना आपल्या प्रभागातील कामे आपल्या माध्यमातून पोहोचावीत, असे आवाहनही यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

भारतीय जनता पक्षाने नेहमीच सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून काम केले आहे. गरिबांच्या हितासाठी, शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी, महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि तरुणांच्या उज्ज्वल भविष्यासाठी भाजपची बांधिलकी आहे. आपली निष्ठा, आपले कर्तृत्व, आणि आपले योगदान पक्षाला अधिक बळकट करेल. आपण केवळ पक्षाचे सदस्य होणार नाही, तर देशाच्या प्रगतीचा एक भाग बनणार आहात. आपली प्रत्येक कृती ही देशहितासाठी असावी, आपल्या कार्यातून लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला पाहिजे. आपण पक्षाच्या विचारधारेला प्रामाणिकपणे पुढे घेऊन जा, पक्षाचा विस्तार करत आपल्या मेहनतीतून पक्षाला अधिक बळकट करा, असे आवाहन यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. स्थानिक नागरिकांचीही यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जेऊर ते अक्कलकोट-गाणगापूर सायकल यात्रा सायकल चालवा व निरोगी रहा संदेशाचा प्रसार

**सोलापूर | प्रतिनिधी**

जेऊर येथील तरुणांनी सायकल चालवा व निरोगी रहा असा संदेश देण्यासाठी जेऊर ते अक्कलकोट आणि गाणगापूर दरम्यान सायकल यात्रा काढली आहे.

या उपक्रमामध्ये उद्योजक तात्यासाहेब भारत कळसाईत, सतीश बबन टिंगरे, दत्ता नाना चव्हाण आणि सचिन मोहन चापकानाडे यांनी सहभाग घेतला.

सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष आणि प्रदूषणामुळे होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन, सायकलचा वापर वाढवण्याचा हा प्रयत्न आहे. या यात्रेत सहभागी तरुणांनी प्रवासादरम्यान गावागावांमध्ये सायकल वापराचे महत्त्व पटवून देत इंधनावर चालणाऱ्या वाहनांऐवजी सायकल वापरण्याचा आग्रह केला.

या उपक्रमाची सुरुवात तात्यासाहेब कळसाईत व त्यांच्या सहकाऱ्यांनी काही वर्षांपूर्वी जेऊर ते पंढरपूर सायकलवारीपासून केली. आता अक्कलकोट आणि गाणगापूरपर्यंतचा प्रवास करत, देवदर्शन घेत तरुणांना आरोग्य आणि पर्यावरणसंवर्धनाचा संदेश दिला जात आहे.

सूर्योदयानंतर सुरू होणारी ही यात्रा सूर्यास्तापूर्वी थांबवली जाते. या उपक्रमामुळे तरुणाईला सायकल चालवण्याची प्रेरणा मिळत असून आरोग्य व प्रदूषण नियंत्रणासाठी हा उपक्रम समाजासाठी आदर्श ठरत आहे.

तात्यासाहेब कळसाईत म्हणाले की, सायकल चालवणे फक्त व्यायामच नाही तर पर्यावरणासाठीही लाभदायक आहे. रोज सायकल चालवा आणि निरोगी राहा.



# ६४ गावांमध्ये स्वामीत्व योजने अंतर्गत सनद वाटप कार्यक्रमाचे विशेष आयोजन

## १८ जानेवारीला नियोजन सभागृहात आयोजन

**भंडारा | प्रतिनिधी**

भंडारा, दि. १७ महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील उपलब्ध गावठाणातील गावांच्या जमिनीचे स्वामित्व योजणे अंतर्गत ग्रामीण जनतेला मिळकतीची सनद, आखीव पत्रिका व नकाशा डिजीटल स्वरुपात अधिकार अभिलेख तयार करण्याची महत्वाकांक्षी व लोकाभिमुख योजना भूमि अभिलेख व महसूल विभाग, ग्राम विकास विभाग आणि सर्वे ऑफ इंडिया यांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात येत आहे.

गावांची वाढती लोकसंख्या विकासाच्या निरनिराळया योजना यामुळे गावात भौगोलीक बदल होत असून जमिन हस्तांतरणांची प्रकिया वेगाने सुरु आहे. मात्र ग्रामीण भागात गावठाणाचे अभिलेख नसल्यामुळे नेमकी जागा किती याबाबत सुस्पष्टता नसते. गावठाण कार्यक्षेत्रातील बांधकाम परवाने देण्याचे अधिकार योग्य पध्दतीने हाताळण्याकरिता गावठाण भूमापन होऊन प्रत्येक मिळकतीचा नकाशा असणे आवश्यक आहे.तसेच मालमत्तेचे मालकी पत्र (प्रापर्टी कार्ड) नसल्यामुळे आर्थिक पतही निर्माण होत नाही. ग्रामस्थांची अशी होणारी गैरसोय टाळणे गरजेचे असल्याने ग्रामविकास विभागाने दि. २२ फेब्रुवारी २०१९ रोजी गावठाणामधील जमिनीचे जी.आय.एस. आधारित सर्वेक्षण व भूमापन करणेबाबत योजना राबविण्यास मान्यता दिलेली आहे. या योजनेच्या कार्यवाहीसाठी ग्राम विकास विभाग यांचेकडील दि. ०८ मार्च २०१९ रोजीच्या अधिसूचनेनुसार गावांतील जागेचे भूमापन करण्याचे निर्देश दिलेले आहेत. केंद्र शासन व महाराष्ट्र राज्य शासन यांचे पंचायत राज विभागा मार्फत महाराष्ट्र राज्याची गावठाण जमाबंदी योजना स्वामीत्व योजना म्हणून सर्व प्रथम संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू करण्यात आलेली आहे.नागपूर विभागात एकूण ८७८० महसूली गावांपैकी ६०७५ गावांमध्ये ड्रोण फलॉय पूर्ण झालेली आहेत. त्यापैकी ४५२५ गावांच्या सनद तयार झालेल्या असून त्यापैकी ४३३८ गावांमध्ये सनद वाटप करण्यात आलेली आहे. तसेच भंडारा जिल्हयात एकूण ८९८ महसूली गावांपैकी ६४४ गावांत ड्रोण फलॉय पूर्ण झालेली असून त्यापैकी ५०५ गावांच्या सनद तयार झालेल्या असून त्यापैकी ४५० गावांमध्ये सनद वाटप करण्यात आलेली आहे.सनदेमुळे ग्रामीण भागातील जनतेच्या मिळकतीचे हक्कांचे संरक्षण बँकेचे कर्ज, गावातील रस्ते, शासकीय जागा, यांच्या सिमा निश्चित होऊन अतिक्रमण रोखता येईल., ग्रामीण भागांतील मिळकतींच्या न्यायालयीन दाव्यांचे निराकरण होईल. या मालकी पत्रामुळे/सनदेमुळे ग्रामस्थांची आर्थिक पत उंचावून त्यांचे खरेदी/विक्री व्यवहारात भरीव प्रगती होईल. मा. पंतप्रधान, भारत सरकार महोदय हे स्वामित्व योजने अंतर्गत ५८ लाखांहुन अधिक मिळकतधारकांना मालमत्ता कार्डचे/ सनदचे वितरण व सदर योजने अंतर्गतच्या लाभार्थी यांच्या सोबत संवाद दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता साधणार आहेत.भंडारा जिल्हयातील स्वामित्व योजने मधील लाभार्थी यांना प्रातिनिधिक स्वरुपात सनद वाटपाचा कार्यक्रम दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, भंडारा येथे भूमि अभिलेख, महसूल विभाग व ग्राम विकास विभाग यांचे संयुक्त विद्यमानाने आयोजित केलेला आहे. तसेच भूमि अभिलेख विभागाकडून निवडण्यात आलेल्या तालुकानिहाय ४१ गावांमध्ये ८७१९ लाभार्थ्यांना सनद वाटप कॅम्पचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे भंडारा जिल्हयातील स्वामीत्व योजणे अंतर्गत गावठाणा आतील मिळकतींचे गावठाण भूमापन करण्यात आलेल्या मिळकत धारकांनी सनद प्राप्त करुन घेणेबाबत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख भंडारा यांचे अधिनस्त सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचे वतीने मिळकत धारकांना आवाहन करण्यात येत आहे.

# पुस्तक वाचन व परिक्षण कार्यक्रमाचे आयोजन




**वर्धा | प्रतिनिधी**

लोक महाविद्यालय, वर्धा आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पुस्तक वाचन व परिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत लोक महाविद्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे प्रा. डॉ. गजानन कोटेवार होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा ग्रंथालय अधिकारी नितीन सोनोने, लोक महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. महेंद्र सहारे आणि प्रा. मोहन सोनुरकर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी वाचन संस्कृती वाढविण्याचे महत्त्व, पुस्तके वाचनातून होणारा मानसिक व वैचारिक विकास, तसेच ग्रंथालयांच्या भूमिकेवर भर दिला. वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणाऱ्या अशा उपक्रमांमुळे तरुणाईमध्ये वाचनाची आवड निर्माण होईल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक आणि वाचनप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. लोक महाविद्यालय व जिल्हा ग्रंथालय कार्यालयाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वी झाला.

# संबोधी नगरमधील कुलूप बंद घरात चोरी, १ लाख ३ हजार रुपयांचा ऐवज लंपास

**वर्धा | प्रतिनिधी**

शहरातील संत तुकडोजी वॉर्डातील संबोधी नगर येथे एका कुलूपबंद घरात अज्ञात चोरट्यांनी चोरी करून १ लाख ३ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी बुधवारी पोलिसांकडून माहिती देण्यात आली.

पोलिसांच्या माहितीनुसार, विशाल थुल हे आपल्या कुटुंबासह घराला कुलूप लावून टाकघाट येथे कार्यक्रमाला गेले होते. १४ जानेवारीला परत आल्यानंतर त्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसले. घरात प्रवेश करताच कपाटातील कपडे अस्ताव्यस्त पडलेले दिसले. चोरट्यांनी कपाटातील ४० हजार रुपये रोख रक्कम आणि ६३ हजार रुपयांचे दागिने चोरून नेले.

पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून, चोरांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू केला आहे. स्थानिक नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. या घटनेमुळे परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# साई माऊली कलामंच (मुंबई) यांचा प्रयोग क्र.3 यशस्वी रित्या संपन्न झाला

## व्यथा जीवनाची लोकनाट्य ठरलं प्रेरणादायी संदेश देणारं







**नरेश मोरे | मुंबई**

कोकणच्या मातीत स्थापित झालेला आणि नव्याने ओळख असलेला कलामंच म्हणजे साई माऊली कलामंच (मुंबई). यांचा तिसरा प्रयोग रविवार, १२ जानेवारी २०२५ रोजी मराठी साहित्य संघ मंदिर, गिरगाव, चर्नी रोड, मुंबई येथे यशस्वीपणे संपन्न झाला. या कार्यक्रमात कोकणची लोककला रसिक प्रेक्षकांना भावली.

कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, आणि एक विलक्षण कार्यक्रम अनेक कलाकारांना संधी देत मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला अधिसभा सदस्य महाराष्ट्र शासन, किसन सावंत , उपशाखा प्रमुख सन्मा. सचिन राऊत , युवती शाखा अधिकारी अनुष्का हजारे , सागर डावल, अनंत मोरे, संतोष कोत्रे आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांचा सत्कार रमेश ठोंबरे व सचिन ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रमुख पाहुणे सन्मा. किसन सावंत साहेब आणि सहकाऱ्यांनी शंकर कळंबटे व पत्रकार नरेश मोरे यांचा शाल व श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन विशेष सन्मान केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला नवोदित कलाकारांनी नमन सोहळा रंगमंचावर मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला. या नमनामध्ये गणेश आराधना, गण-गवळण, राधा-कृष्ण प्रेमकहाणी, प्रेमगीत आणि रासलीला बघायला मिळाली. शेवटी एकुलता एक मुलगा आपल्या स्वतःच्या संसाराचं काय करतो आणि अठरा विश्व दारिद्र्य असलेल्या गरिब आई-बाप काबाडकष्ट करून मुलाला शिक्षण देतात, त्याचा परतावा म्हातारपणी आजारात बाप मरेपर्यंत न बघता केवळ छोटा नातू आजी-आजोबांच्या बाजूने बापाची कान उघडणी करतो. हृदयस्पर्शी अशा या विषयावर आधारित लोकनाट्य रसिक माय-बापांना रडवण्यास भाग पाडत अंक संपला.

या संपूर्ण नमन कार्यक्रमाला रसिक माय-बापांनी भरभरून प्रतिसाद दिला. एकंदरीत, संपूर्ण नमन सुंदर संकल्पनांसह संपन्न झाला.

**प्रयोगासाठी संपर्क**

**सचिन ठोंबरे - ९९२०७८२३८१**
**नरेश मोरे - ७०३९४९८६९९**
**रमेश ठोंबरे - ७३०४२३६१९६**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# ग्रामीण महिलांसाठी आर्थिक सक्षमीकरणाचे नवे दालन

**भंडारा | प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी तसेच त्यांच्या उपजीविका वाढीसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, उमेदच्या अंतर्गत भंडारा जिल्ह्यात एप्रिल २०१८ पासून विशेष उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या अभियानाद्वारे आजपर्यंत एकूण १४,०२४ महिला बचत गटांची निर्मिती करण्यात आली असून, यामध्ये १,५८,३६० ग्रामीण महिलांना सहभागी करून घेण्यात आले आहे.

महिला बचत गटांना एकत्र आणत, त्यांचे सामूहिक कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी गावपातळीवर ७२३ ग्रामसंघांची स्थापना करण्यात आली आहे. याशिवाय, जिल्हा परिषद गण निहाय ५२ प्रभाग संघांची निर्मिती झाली आहे.

ग्रामीण भागातील महिलांच्या उपजीविकेसाठी विविध आर्थिक स्रोत निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. २०२४-२५ च्या वार्षिक उद्दिष्टांनुसार, ९८% यश संपादन करत १४२.८० कोटी रुपयांचे कर्ज महिलांना




उपलब्ध करून दिले गेले आहे. या योजनेसाठी आवश्यक त्या प्रशिक्षणाद्वारे महिलांना सक्षम बनविण्यावरही भर दिला जात आहे.

महिला शेतकऱ्यांना सशक्त करण्यासाठी उमेदच्या माध्यमातून भंडारा जिल्ह्यातील ७ तालुक्यांमध्ये एकूण १२ महिला किसान उत्पादक कंपन्या स्थापन करण्यात आल्या आहेत. प्रत्येक कंपनीमध्ये जवळपास ७५० महिलांना सभासद म्हणून जोडण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, जिल्ह्यातील दोन महिला उत्पादक कंपन्या केंद्र शासनाच्या १०,००० शेतकरी उत्पादक कंपनी योजनेंतर्गत निवडल्या गेल्या आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लखपती दीदी या



महत्वाकांक्षी योजनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी उमेदचा मोठा वाटा आहे. उमेदच्या साहाय्याने ग्रामीण महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

ग्रामीण भागातील महिलांना केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिकदृष्ट्याही सक्षम बनविण्यासाठी उमेदच्या माध्यमातून उपजीविका वाढीवर भर दिला जात आहे. या प्रयत्नांमुळे महिला आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने मोठी पावले टाकत आहेत.

भविष्यात उमेदच्या या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील महिला नव्या उंचीवर पोहोचतील आणि त्यांच्या कुटुंबासाठी उज्ज्वल भविष्य घडेल, हीच अपेक्षा

# स्नेहसंमेलन हे मनोरंजन नसून एक संस्कार आहे-विलास वाघाये यांचे मत

**भंडारा | प्रतिनिधी**

लाखनी येथील स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दिनांक १३ व १४ जानेवारी २०२५ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.

१३ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता स्नेहसंमेलनाचे उद्घाटन तहसीलदार धनंजय देशमुख यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणेचे सदस्य विलास वाघाये पाटील होते. यावेळी सरपंच स्वप्नील बोरकर, महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. गणेश कापसे, डॉ. सुधाकर शेंडे, मनीषा सपाटे यांची विशेष उपस्थिती होती.

तहसीलदार देशमुख यांनी विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकासासाठी मिळणाऱ्या संधींबाबत मार्गदर्शन केले, तर सरपंच स्वप्नील बोरकर यांनीही स्नेहसंमेलनाचे महत्त्व पटवून दिले. अध्यक्षीय भाषणात विलास वाघाये पाटील यांनी स्नेहसंमेलन हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून, विद्यार्थ्यांवर संस्कार घडवणारे व्यासपीठ




असल्याचे मत मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी प्राचार्य डॉ. कापसे यांनी केले, सूत्रसंचालन स्मिता तीतरमारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मनीषा सपाटे यांनी मानले. उद्घाटनानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत एकल नृत्य, नाटक, पथनाट्य, लावणी, आदिवासी नृत्य इत्यादी सादर करण्यात आले.

१४ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता समारोप व बक्षीस वितरण सोहळा पार पडला. प्रमुख अतिथी संस्थेचे सचिव सुधीर कुकडे, महिला व बालकल्याण सभापती स्वाती वाघाये, पंचायत समिती लाखनी सभापती प्रणाली सार्वे, मनीषा हलमारे, नितीन वाघाये व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

समारोप सोहळ्यात स्वाती वाघाये यांनी पारितोषिक विजेत्यांचे अभिनंदन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. कापसे यांनी स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना व व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनीषा सपाटे यांनी केले. समारोप सोहळ्याचे सूत्रसंचालन श्रद्धा बोरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. योगेश करवाडे यांनी मानले.

संपूर्ण स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील विविध विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दै.सह्याद्रीचा राखणदार वृत्तपत्राच्या बातमीची दखल; वाहतूक पोलीस ॲक्शन मोडवर

## बिरवाडी मच्छी मार्केटमध्ये अवैध पार्किंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई


दैनिक सह्याद्रीचा राखणदार

बिरवाडी मच्छी मार्केट व्यापाऱ्यांना सोसावा लागतोय रहदारीचा नाहक त्रास

वाहतूक पोलीसाची नेमणूक करावी, व्यापाऱ्यांची मागणी

महाड | प्रतिनिधी

महाड तालुक्यातील बिरवाडी शहरातील मच्छी मार्केट बाजारपेठ सध्या वाहतूक कोंडीमुळे अडचणीत आली आहे. तेथील स्थानिक व्यापाऱ्यांना या वाहतूक कोंडीचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बिरवाडी हायस्कूल बाजारपेठेतील नवीन पूल बांधणीचे काम गेल्या दीड महिन्यांपासून सुरू आहे, मात्र ते अजून पूर्ण झालेलं नाही. या पुलाच्या बांधकामासाठी दुचाकी व चारचाकी वाहनांसाठी पर्यायी मार्ग न सोडल्यामुळे सर्व वाहनं बिरवाडी मच्छी मार्केटच्या अरुंद रस्त्यावरून ये-जा करीत आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून, वाहतूक कोंडीवरून

मार्केटमध्ये वाहतूक पोलीसाची नेमणूक लवकरात लवकर पूर्ण करून वाहतुकीचा






**महाड | प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील बिरवाडी शहरातील मच्छी मार्केट सध्या वाहतूक कोंडीमुळे चर्चेचा विषय ठरले आहे. या कोंडीमुळे स्थानिक व्यापाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बिरवाडी हायस्कूल बाजारपेठ येथील नवीन पूल बांधणीचं काम सुरू असताना ठेकेदाराने पर्यायी मार्ग न सोडल्याने ही समस्या निर्माण झाल्याचा आरोप स्थानिक व्यापाऱ्यांनी केला आहे.

गेल्या महिन्याभरापासून पुलाचे काम अपूर्ण अवस्थेत असून, मच्छी मार्केट परिसर रहदारीचा केंद्रबिंदू बनला आहे. *दै. सह्याद्रीचा राखणदार* या वृत्तपत्रात याबाबत सविस्तर बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर वाहतूक पोलिसांनी तातडीने दखल घेतली.

काल वाहतूक पोलिसांनी अवैध पार्किंग करणाऱ्या वाहनांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केली. पोलिसांनी स्पष्ट केले की अशा प्रकारे रोज कारवाई केली जाईल. वाहतुकीचा मार्ग मोकळा करण्यासाठी मच्छी मार्केटमध्ये वाहतूक पोलिसांची कायमस्वरूपी नेमणूक करण्यात येणार आहे. वाहतूक पोलिसांच्या या कारवाईमुळे स्थानिक व्यापाऱ्यांना थोडासा दिलासा मिळाला आहे. मात्र, नवीन पूल बांधणीचे काम कधी पूर्ण होईल, याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

# लोकसहभागातून अडेगाव शिवारात वनराई बंधाऱ्याची निर्मिती



**वर्धा | प्रतिनिधी**

पाणी फाउंडेशन आणि देवळी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली मौजा अडेगाव शिवारातील स्मशानभूमीजवळ वनराई बंधाऱ्याची यशस्वी उभारणी करण्यात आली. या उपक्रमात गौळ येथील संघर्ष शेतकरी गट आणि नाचणगाव येथील यशस्वी गटातील सदस्यांनी सहभाग नोंदवला.बंधाऱ्याची उभारणी खतांच्या गोण्यामध्ये रेती व माती भरून करण्यात आली. या बंधाऱ्यामुळे अडेगाव, गौळ, आणि कृष्णापूर शिवारातील हरभरा व गहू पिकांसाठी संरक्षित पाणीपुरवठा उपलब्ध होईल. तसेच, या परिसरातील गुरांसाठीही पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवली जाणार आहे.या उपक्रमाने जलसंधारणाच्या दृष्टीने लोकसहभागाचा आदर्श घालून दिला आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे हा बंधारा उभारला गेला असून, तो भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.ग्रामस्थांनी या उपक्रमाचे कौतुक केले असून, इतर गावांनीही या उदाहरणातून प्रेरणा घ्यावी, अशी भावना व्यक्त करण्यात आली आहे.

# रस्त्याच्या कामासाठी वृक्षतोड, वनविभागाचे दुर्लक्ष

**वर्धा | प्रतिनिधी**

देवळी-पुलगाव मतदारसंघातील अल्लीपूर ते लहान वणी मार्गावर रस्त्याचे बांधकाम सुरू असताना झाडांची अनावश्यक तोड आणि फांद्यांची कापणी केली जात असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाकडे वनविभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी खोदकामासाठी ठेकेदाराकडून मोठ्या प्रमाणात झाडांची तोड केली जात आहे. विशेषतः प्रशासनाने लाखो रुपये खर्च करून रस्त्याच्या दुतर्फा लावलेल्या झाडांच्या फांद्या आणि काही झाडे नष्ट केली जात आहेत.अल्लीपूर मार्गावर भर दिवसा अवैध वृक्षतोड व लाकडांची वाहतूक सुरू असल्याचेही चित्र आहे. मात्र, याकडे वनरक्षक व संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत



असल्याचे दिसत आहे.रस्त्याच्या कामासाठी गरज नसताना झाडांची तोड करणे हे पर्यावरणीय दृष्टीने गंभीर आहे.हा प्रकार रोखण्यासाठी वनविभाग व प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी स्थानिक नागरिक व पर्यावरण प्रेमी करत आहेत.झाडांची अनावश्यक तोड थांबवून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात, अन्यथा या प्रकरणी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# हिंगणघाट प्रमुख मार्गांवर महिला स्वच्छतागृहांचा अभाव;महिलांची कुचंबना वाढली




**वर्धा | प्रतिनिधी**

हिंगणघाट शहरातील प्रमुख मार्गांवर महिला स्वच्छतागृहांचा अभाव हा गंभीर प्रश्न बनला आहे. शहरात रस्त्यांच्या विकासकामांचा ओघ वाढला असून अनेक रस्त्यांची बांधकामे पूर्णत्वास पोहोचली आहेत किंवा प्रगतीपथावर आहेत. मात्र, या रस्त्यांच्या नियोजनामध्ये महिलांच्या स्वच्छतागृहांचा विचार झालेला दिसत नाही, त्यामुळे महिलांना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत आहे.हिंगणघाट शहर चारही बाजूंनी ग्रामीण भागांनी वेढलेले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक महिला ऑटो, बस किंवा खाजगी वाहनांद्वारे शहरात येत असतात. मात्र, स्वच्छतागृहांच्या अभावामुळे त्यांना मोठी कुचंबना सहन करावी लागत आहे. महिलांसाठी स्वच्छतागृहांची योग्य सोय नसल्याने सार्वजनिक ठिकाणी त्यांच्या मूलभूत गरजाही पूर्ण होत नाहीत. हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असून, महिलांच्या सुरक्षिततेच्या व सन्मानाच्या दृष्टिकोनातून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.स्थानिक प्रशासन व संबंधित विभागांनी महिलांच्या समस्यांकडे लक्ष देत शहरात योग्य ठिकाणी स्वच्छतागृहांची उभारणी करावी, अशी मागणी नागरिक व सामाजिक संस्थांकडून होत आहे.

# दारूबंदीला हरताळ ! हदगाव तालुक्यातील बाभळी गावात राजरोस दारू विक्री; संतप्त ग्रामस्थांचा प्रशासनाला अल्टीमेटम

**नांदेड | प्रतिनिधी**

हदगाव तालुक्यातील पैनगंगेच्या बेटावर वसलेल्या बाभळी गावात दारूबंदी फक्त कागदीरूपात आहे, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. या गावात, जिथे सुमारे ३,००० लोकसंख्या आहे, राजकीय वरदहस्तामुळे दिवसाढवळ्या अवैध दारू विक्री सुरू आहे, ज्यामुळे गोरगरीब कुटुंबांचे संसार विखुरले आहेत. पोलिसांच्या निष्क्रियतेमुळे संतप्त ग्रामस्थांनी २६ जानेवारी रोजी अर्धनग्न आंदोलनाचा इशारा दिला आहे.


बाभळी गावातील शेतकरी व कष्टकरी आपल्या प्रपंचासाठी प्रामाणिकपणे काबाडकष्ट करत आहेत, परंतु गावातील काही लोकांनी अवैध दारू विक्रीचे रॅकेट चालवले आहे. यामुळे अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडली असून महिलांना जीवन जगणे कठीण झाले आहे. घराचे उत्पन्न दारूत उधळत आहेत, यामुळे आमचं आयुष्य उधळले गेलं आहे, अशा शब्दांत महिलांनी आपली व्यथा व्यक्त केली. ग्रामस्थांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत, ज्यानुसार दारू विक्री बंद करण्यासाठी त्यांनी अनेक वेळा तक्रारी दाखल केल्या, मात्र पोलिसांनी दुर्लक्ष केले आहे. ग्रामस्थांचा आरोप आहे की, या विक्रीमागील लोकांची चौकशी व्हावी, यासाठी त्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे. गावकऱ्यांनी २६ जानेवारी रोजी हदगाव पोलीस ठाण्याबाहेर अर्धनग्न आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. जर प्रशासनाने त्वरित उपाय योजना केली नाही, तर मोठे आंदोलन उभे करावे लागेल, असा ठाम इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

विशेष म्हणजे गावात दारूबंदीच्या ठरावाला मंजुरी मिळाल्याचे सांगण्यात येत आहे, तरीही प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे या विक्रीला पुन्हा वाव मिळाल्याचे दिसून येत आहे. बाभळी गावातील संतप्त जनतेच्या मागण्यांकडे प्रशासन कसा प्रतिसाद देते, याकडे सध्या सर्वांचे लक्ष लागले आहे.



**ग्रामस्थांचे प्रशासनाला आवाहन**

१. बाभळी गावातील अवैध दारू विक्री तात्काळ बंद करा.
२. दोषी पोलिसांवर कडक कारवाई करा.
३. ग्रामस्थांच्या तक्रारींवर त्वरित कार्यवाही करा.



# 'गोदाकाठ महोत्सवातून बचत गटाच्या महिलां बरोबरच छोट्या मोठ्या उद्योगांना आर्थिक ताकद'

**कोपरगाव । प्रतिनिधी**

संधी मिळाली तर महिला देखील संधीचे सोने करू शकतात, याचा विश्वास असल्यामुळे बचत गटाच्या महिलांनी तयार केलेल्या मालाला हक्काची बाजारपेठ मिळवून द्यावी, या उद्देशातून माजी आमदार अशोकराव काळे व आमदार आशुतोष काळे यांच्या सहकार्याने प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळाच्या अध्यक्षा पुष्पाताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली गोदाकाठ महोत्सव सुरु करण्यात आला.

या गोदाकाठ महोत्सवाला बचत गटाच्या महिलांनी दिलेला प्रतिसाद आणि कोपरगावकरांनी खरेदी करतांना दाखविलेल्या उत्साहातून बचत गटाच्या महिलांबरोबरच छोट्या मोठ्या उद्योगांना आर्थिक ताकद देण्याचा उद्देश सफल झाला असल्याचे जिल्हा बँकेच्या संचालिका चैताली काळे यांनी सांगितले.

शुक्रवारपासून सुरू झालेल्या गोदाकाठ महोत्सवाची मोठ्या उत्साहात सोमवारी सांगता झाली. यावेळी स्टॉलधारक बचत गटाच्या महिलांशी चैताली काळे यांनी संवाद साधला. बोचऱ्या थंडीचा विचार न करता कोपरगाव शहरासह मतदार संघातील नागरिकांनी प्रतिसाद देतांना गोदाकाठ महोत्सवाला कुटुंबासह भेट देवून चार दिवसात खरेदी करतांना हात आखडता न घेता केलेल्या मनसोक्त खरेदीतून मोठ्या प्रमाणात मालाची विक्री झाल्याचे बचत गटाच्या महिलांनी यावेळी सांगितले. खानदेशातील प्रसिद्ध असलेल्या खापरावरचे पुरणाचे मांडे तयार करण्यासाठी चार-पाच महिला राबत असतांना देखील नागरिकांना हे मांडे घेण्यासाठी नंबर लावावे लागत होते. तर तयार मसाले व घरगुती तयार केलेले विविध कडधान्याचे पापड खरेदी करण्यास महिलांनी पसंती दिली. जवळपास सव्वा तीनशेच्या वर स्टॉल्सला भेट दिल्यानंतर ग्रामीण संस्कृतीच्या खाद्य पदार्थाचे दर्शन घडविणाऱ्या विविध खाद्य पदार्थाबरोबर वांग्याचे भरीत आणि त्याला जोडी असललेल्या गरम गरम थाली पीठाने नागरिकांच्या जिभेचे चोचले पुरविले.

तर प्रचंड गर्दी असल्यामुळे कित्येक नागरिकांनी महाराष्ट्राच्या विविध भागांतील अस्सल गावरान चवीच्या दुर्मिळ खाद्यपदार्थाचा मनसोक्त आस्वाद घेण्यासाठी पार्सल घेवून जाणे पसंद केले. गोदाकाठ महोत्सवाची महती जिल्हा व राज्यापुरती मर्यादित राहिली नाही. ही महती देशभर पसरली असल्यामुळे गोदाकाठ महोत्सवाच्या चार दिवसात बचत गटाच्या महिलांनी



कोट्यावधीचा व्यवसाय केला.

आज महिला कोणत्याही क्षेत्रात मागे राहिलेली नाही. स्वतःच्या ज्ञानावर व बुद्धी कौशल्यावर घर संसार सांभाळून महिला स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करीत आहे. महिलांना विशेषत: ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक ताकद देण्याचा गोदाकाठ महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. आ. आशुतोष काळे यांचे याकामी मोठे सहकार्य मिळत असल्याचे चैताली काळे यांनी सांगितले.

कलाकुसरीच्या वस्तू, मसाला, लोणचे, पापडाला मागणी

कलाकुसरीच्या वस्तू, सजावटीचे साहित्य, मसाला,लोणचे, पापड अशा अनेक गोष्टी विक्रीसाठी महिलांनी आणल्या होत्या. बचत गटाच्या महिलांना तयार मालाची विक्री करण्यासाठी व मतदारसंघातील छोट्या मोठ्या व्यवसायिकांना व्यासपीठ मिळाल्यामुळे त्यांच्या देखील व्यवसायाची आर्थिक वृद्धी झाली. त्याचबरोबर विविध शाळेतील नवोदित कलाकारांना आपले कलागुण सादरीकरणासाठी देखील व्यासपीठ उपलब्ध करून दिल्यामुळे विदयार्थ्यांनी आपले कला, गुण सादर करून महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवत नागरिकांचे मनोरंजन करून त्यांना मंत्रमुग्ध केले. प्रत्येक गावागावात परंपरेनुसार सण उत्सवाच्या वेळी यात्रा-जत्रा भरविल्या जातात. त्या माध्यमातून आपल्या परंपरा जपल्या जातात. या परंपराची ओळख बुजली जावू नये. या परंपरा भावी पिढीच्या नेहमी स्मरणात राहण्यासाठी गोदाकाठ महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. या प्रयत्नांना नागरिकांसह बचत गटाच्या महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. मतदार संघातील नागरिकांबरोबरच शेजारच्या तालुक्यातील नागरीक वर्षभर गोदाकाठ महोत्सवाची वाट पाहत असतात. दरवर्षी मोठ्या प्रमाणात होणारा व्यवसाय त्यामुळे गोदाकाठ सुरु होण्यापूर्वीच दोन महिने अगोदर सर्व स्टॉल्स बुक झालेले असतात. ग्रामीण भागातील महिला उद्योजकांना प्रोत्साहन देवून त्यांची आर्थिक ताकद वाढविण्याचा, ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणारा 'गोदाकाठ महोत्सव' केंद्रबिंदू बनला आहे.

# १८ जानेवारी रोजी होणार महाप्रसाद


**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक संकट मोचन हनुमान मंदिर, गुंजखेडा येथे ध्वज दिनाच्या स्मरणार्थ १८ जानेवारी रोजी भाविकांकडून भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

वर्धा नदीच्या काठावर वसलेल्या संकट मोचन हनुमानाचे मंदिर आणि जागृत आसरा मातेचे मंदिर भाविकांसाठी श्रद्धेचे स्थान आहे. येथे दररोज हनुमान चालीसा, संकट मोचन, बजरंग बाण, जय जय हनुमान गोसाई यांची धून व आरती केली जाते. प्रसाद वाटपाचा विधी भाविकांसाठी आनंददायी ठरतो.

अनेक वर्षांपूर्वी, नदीवर स्नानासाठी गेलेल्या भक्तांना अचानक मंदिरावर झेंडे फडकताना दिसल्याचा चमत्कार घडला होता. या अद्भुत घटनेनंतर ध्वज दिनाच्या स्मरणार्थ दरवर्षी गृहहवन, भजन, कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

कै. विजयबहादूर त्रिपाठी, बद्रीप्रसाद केशरवाणी, कै. रमेशराव रोठेकर, कै. विश्वनाथ बुरे, कै. किशनचंद ढिंग, कै. मदनलाल शर्मा आणि कै. पं. बनवारीलाल शर्मा यांच्या प्रेरणेने संकट मोचन



हनुमान मंदिर ट्रस्टने हे धार्मिक कार्य सुरू केले. आजही हे कार्य भाविकांच्या सहकार्याने सुरळीत सुरू आहे.

भाविकांनी या धार्मिक महाप्रसादाचा लाभ घ्यावा व ध्वज दिनाचे महत्त्व अनुभवावे, असे आवाहन संकट मोचन हनुमान मंदिरातील भक्तांनी केले आहे

# गंगाखेड पंचायत समितीकडून समाज कल्याण विभागाचे अनुदान अद्यापही खात्यात जमा नाही

**गंगाखेड । प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यातील समाज कल्याण विभागाच्या शिलाई मशीन योजनेतील लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदान अद्याप जमा झालेले नाही, त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. समाज कल्याण विभागाकडून मंजूर लाभार्थी यादीत असतानाही योजनेचा लाभ घेतलेल्या श्रीमती सुमित्रा सुभाष जगे यांचे खात्यात अनुदान जमा झालेले नाही.संबंधित योजनेचा अर्ज २०२३ मध्ये गंगाखेड पंचायत समिती येथे सादर करण्यात आला होता. यानंतर संबंधित कार्यालयाने कामाची पूर्णता केली असली तरी अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा न होण्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. लाभार्थी नियमितपणे धोकशी करत असतानाही उडवीची उत्तरे मिळत आहेत. २०२२ सालच्या यादीत देखील लाभार्थी असतानाही अनुदान मिळालेले नाही. वसंतराव गेजगे यांनी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे आणि त्या अनुषंगाने एक निवेदन देण्यात आले आहे, ज्यात त्यांनी तात्काळ अनुदानाच्या रकमेला खात्यात जमा करण्याची मागणी केली आहे

# पुलगावात मोकाट श्वानांचा आतंक जखमींची संख्या वाढतीवर

**पुलगाव । प्रतिनिधी**

शहरातील मोकाट श्वानांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मोकाट श्वानांच्या चावण्याच्या घटनांमुळे ग्रामीण रुग्णालयात प्रतिबंधक लस घेणाऱ्या नागरिकांची संख्या सतत वाढत आहे.

पूर्वी सर्कस मैदान परिसर व शहराबाहेरील महामार्गालगत मास विक्री होणाऱ्या ठिकाणी श्वानांची संख्या अधिक होती. मात्र, आता शहरातील गांधीनगर, हरिराम नगर यांसारख्या गजबजलेल्या भागांतही श्वानांचा आतंक वाढला आहे. या मोकाट श्वानांमुळे पादचाऱ्यांसह मोटरसायकलस्वारांना मोठा धोका निर्माण झाला आहे. श्वानांच्या अंगावर धावून येण्यामुळे अनेक अपघात झाले आहेत. वृद्ध नागरिक व लहान मुले श्वानांच्या जवळून जाण्याची हिंमतही करीत नाहीत.

नगर परिषदेतर्फे मोकाट श्वानांवर नियंत्रणासाठी एका खासगी कंपनीला कंत्राट देण्यात आले होते. या कंपनीने केवळ ठराविक भागांतील श्वानांना पकडून नसबंदी केली व पुन्हा सोडून दिले. इतर भागांतील श्वानांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने नागरिकांच्या समस्या सुटल्या नाहीत. नागरिकांनी अनेक वेळा घातक श्वानांची माहिती दिली, मात्र ती श्वाने न पकडल्याने समस्या अधिकच बिकट झाली आहे.

श्वान चावल्यामुळे ग्रामीण रुग्णालयात लस घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यात लहान मुले आणि तरुणांची संख्या सर्वाधिक आहे. ही परिस्थिती नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे.

नगर परिषद व संबंधित कंत्राटदारांनी हा प्रश्न सोडविण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. श्वान पकडण्याची मोहीम व्यवस्थित न राबविल्यामुळे निर्माण झालेल्या समस्यांवर नगर परिषदेने तातडीने तोडगा काढावा, अशीही मागणी आहे.

# चाकण शिक्रापूर रस्त्यावर कंटेनरचा थरार,अनेक वाहनांना धडक, एक ठार आणि पोलिसांची गाडी उडवली

**शिरूर । प्रतिनिधी**

रमेश बनसोडे - चाकण शिक्रापूर रस्त्यावर गुरुवारी एक भयंकर अपघात घडला. यावेळी एक कंटेनर भरधाव वेगात जात असताना, त्याने रस्त्यावर येणाऱ्या अनेक वाहनांना धडक दिली. या अपघातात एक व्यक्ती मृत्यूमुखी पडली असून, अनेक जण जखमी झाले आहेत.

चाकण शिक्रापूर रस्ता पुण्याच्या बाहेरून मुंबईकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी महत्त्वाचा आहे, आणि येथे उद्योगधंद्यांमुळे वाहतुकीचा मोठा ओढा असतो. कंटेनर व मालवाहतूक वाहनांची संख्या देखील या रस्त्यावर जास्त आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कंटेनरने चाकण शिक्रापूर रस्त्यावर सुसाट धडक देत वाहने उडवली आणि पोलिसांच्या वाहनाला देखील उडवले. घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर जखमी लोक दिसले. काही नागरिकांनी




कंटेनर चालकाला पकडून त्याला चांगला मारहाण केली. पोलिसांनी अपघाताची माहिती घेतल्यानंतर तत्काळ पाठलाग सुरू केला, आणि व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये या घटनांचा थरार दिसून आला.

या अपघातात एक मुलगी गंभीरपणे जखमी झाली असून, तिचा पाय गंभीरपणे जखमी झाल्याने तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. कंटेनर चालकाला शिक्रापूर पोलिसांनी अटक केली असून, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.


# मधपाळ व संस्थांनी मध केंद्र योजनेचा लाभ घ्यावा

**वर्धा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या मधकेंद्र योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील इच्छुक मधपाळ आणि संस्थांनी पुढे यावे, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी अनिता देशमुख यांनी केले आहे.

ही योजना मध उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी अत्यंत उपयुक्त असून, यामध्ये मधपाळांना मोफत प्रशिक्षण, साहित्य स्वरूपात ५० टक्के अनुदान व ५० टक्के स्वहिस्सा, शासनाच्या हमीभावाने मध खरेदी आणि विशिष्ट छंद प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

याशिवाय, मधमाशांचे संरक्षण व संवर्धन यासाठी जनजागृती मोहिमा राबविण्यात येणार



आहेत. यामुळे मध उत्पादन व्यवसायाला चालना मिळेल तसेच इच्छुकांना उद्योजक होण्यासाठी नवे मार्ग उपलब्ध होतील.

या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांनी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा येथे आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

मध उद्योगाशी संबंधित व्यक्तींनी या संधीचा लाभ घेऊन आपला व्यवसाय वृद्धिंगत करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# रेती माफियांवर पोलिसांची कारवाई, लाखोंचा मुद्देमाल जप्त



**वर्धा । प्रतिनिधी**

हिंगणघाट उपविभागीय पोलिसांनी रेती माफियांविरुद्ध मोठी कारवाई करत ७,५७,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. खात्रीशीर माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. पिंपळगाव (ता. हिंगणघाट) येथील महेश उर्फ गोलू महादेव धोटे (वय २७) हा आरोपी मालक टिनू पाटील, संत तुकडोजी वॉर्ड, हिंगणघाट याच्या सांगण्यावरून बिना क्रमांकाच्या लाल रंगाच्या महिंद्रा ट्रॅक्टरमध्ये पोथरा नदीच्या पात्रातील जंगली घाटातून चोरून काढलेली काळी रेती मौजा लाडकी येथे वाहतूक करत होता.

पोलिस पथकाने ट्रॅक्टरला अडवून तपासणी केली असता, ट्रॅक्टर, ट्रॉली आणि १ ब्रास काळी रेती मिळून आली. ही सर्वसाधारणपणे ७,५७,००० रुपये किंमतीची असल्याचे पोलिसांनी सांगितले.

आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली असून जप्त केलेला मुद्देमाल हिंगणघाट पोलिसांच्या ताब्यात आहे. रेती चोरीसारख्या अनधिकृत कृत्यांना आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासन सातत्याने कारवाई करीत असून, जनतेने अशा बेकायदेशीर प्रकारांची माहिती पोलिसांना देण्याचे आवाहन केले आहे.

# वाघाच्या हल्ल्यात वासरू ठार ;वन विभागाची सतर्कता

**वर्धा । प्रतिनिधी**

तालुक्यातील गिरड गावात वाघाने वासरावर हल्ला करून त्याला जागीच ठार केल्याची घटना समोर आली आहे. याबाबतची माहिती वन विभागाने दिली आहे.

गिरड येथील शेतकरी बंडू अंबाडरे यांच्या मालकीचे वासरू इतर जनावरांसोबत शेतात बांधून होते. रात्रीच्या सुमारास वाघाने अचानक हल्ला करून वासराला ठार मारले.

घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला.वाघाच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी घटनास्थळी कॅमेरे लावण्यात आले आहेत. वन विभागाने शेतकरी व स्थानिक नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, वाघाच्या हल्ल्याच्या संभाव्य धोक्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.वन विभाग या घटनेचा पुढील तपास करत असून वाघाला त्याच्या नैसर्गिक अधिवासाकडे वळवण्यासाठी योग्य उपाययोजना करण्यात येत आहेत.



# सण उत्सवांसाठी ध्वनीक्षेपक वापरा बाबत जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश जारी



**वर्धा । प्रतिनिधी**

जिल्ह्यात २०२५ मधील सण उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सकाळी ६ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरासाठी १५ दिवसांची सवलत देण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी आदेश जारी केले आहेत.

केंद्र सरकारच्या ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० च्या परिच्छेद ५ (२) नुसार, ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर श्रोतागृहे, सभागृहे, सामूहिक सभागृहे आणि मेजवाणी कक्ष यांसारख्या बंद जागा वगळता रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत प्रतिबंधित आहे. मात्र, विशेष परिस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांना १५ दिवसांपर्यंत सवलत देण्याचे अधिकार आहेत.सण उत्सवांच्या अनुषंगाने मिळालेल्या या सवलतीमुळे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये ध्वनीक्षेपकाचा वापर शक्य होणार आहे. मात्र, नियमांचे पालन करण्याचे आणि सवलतीचा गैरवापर टाळण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.संबंधित व्यक्तींनी नियमांच्या अधीन राहूनच ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापर करावा, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. आदेशाचा भंग केल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# देवळी येथे महिला महाराष्ट्र केसरी किताब लढत आणि राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन

**देवळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने वर्धा जिल्हा कुस्तीगीर संघ आणि सार्वजनिक बजरंग व्यायाम शाळा, देवळी यांच्या संयुक्त विद्यमाने महिला महाराष्ट्र केसरी किताब लढत २०२४-२५ आणि वरीष्ठ महिला राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दिनांक २४ व २५ जानेवारी २०२५ रोजी विदर्भ केसरी रामदास तडस इनडोअर स्टेडियम, देवळी येथे पार पडणार आहे. स्पर्धेचा उद्घाटन सोहळा २४ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ७.०० वाजता होईल. उद्घाटन आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थानी माजी खासदार नवनीत राणा राहणार आहेत. यावेळी राज्यसभा खासदार अनिल बोंडे, अखिल भारतीय संपर्क प्रमुख श्रीष देवपुजारी, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै. संदीप ऑडवे, हिंदकेसरी पै. योगेश दोडके, आणि अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेतील बक्षीस वितरण समारंभ २५ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ७.०० वाजता होणार आहे. यावेळी महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते बक्षीस वितरण होईल. अध्यक्षस्थानी केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ असतील. तसेच राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार समीर कुणावार, आमदार राजेश बकाने, आमदार प्रताप अडसड, व इतर मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. महिला महाराष्ट्र केसरी किताब लढत ६५ ते ७६ किलो वजन गटासाठी असेल. राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा ५०, ५३, ५५, ५७, ५९, ६२, ६५, व ७२ किलो वजन गटात होणार आहे. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील ५१ संघांचे ४०० महिला कुस्तीपटू, तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील पंच, प्रशिक्षक, व व्यवस्थापक सहभागी होणार आहेत. २५ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजल्यापासून महिला कुस्तीपटूंच्या वजन तपासण्या सुरू होतील. महिला महाराष्ट्र केसरी विजेत्यास चांदीचा गदा, रोख रक्कम, व इतर पुरस्कार दिले जाणार आहेत. या स्पर्धेत नामांकित महिला कुस्तीपटू अमृता पुजारी (कोल्हापूर), भाग्यश्री कोळी (पुणे), प्रतीक्षा बागडी (सांगली), वैष्णवी पाटील (कल्याण), स्वाती शिंदे (कोल्हापूर), व इतर महिला कुस्तीपटू भाग घेणार आहेत. या स्पर्धेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रोत्साहन देण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.या प्रसंगी झालेल्या पत्रकार परिषदेत आयोजक व मान्यवरांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबाबत विश्वास व्यक्त केला. उपस्थितांमध्ये नाना ढगे, डॉ. नरेंद्र मदनकर, शोभा तडस, पंढरी कापसे, राहुल चोपडा, व इतर मान्यवरांचा समावेश होता.




## परभणीत अभिनव उपक्रम



**मकरसंक्रांत निमित्त महिलांना वान म्हणून थोर महानाईकांच्या पुस्तिकांचे वाटप करण्यात आले.**

# वर्धा-आर्वी मार्गावर कार झाडा ला धडकून उलटली; ४ जखमी

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा-आर्वी मार्गावरील तळेगाव (रघुजी) ते खरांगणा (मोरांगणा) दरम्यान अनियंत्रित कार अपघातग्रस्त होऊन झाडाला धडकून उलटल्याने चार जण जखमी झाले. यात दोन जण गंभीर जखमी असून उर्वरित दोघांना किरकोळ दुखापत झाली आहे. ही घटना आज (दि. १५) सकाळी घडली. जखमींना तातडीने रुग्णवाहिकेच्या मदतीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सावद (हेटी) येथील श्रावण नेहारे (६४), नत्थुजी परतेकी (६४), प्रकाशसिंह देवीसिंह बैस (६५) आणि कांता उईके (६२) हे चारजण आर्वीकडून वर्ध्याच्या दिशेने (एमएच ३२ एएस १२५१) प्रवास करत होते. तळेगाव (रघुजी) आणि खरांगणा (मोरांगणा) दरम्यान चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने कार झाडाला धडकून उलटली.या अपघातात श्रावण नेहारे व नत्थुजी परतेकी गंभीर जखमी झाले असून प्रकाशसिंह बैस आणि कांता उईके यांना किरकोळ जखमा झाल्या आहेत. पोलिसांनी घटनास्थळी त्वरित पोहोचून मदतकार्य केले. खरांगणा (मोरांगणा) पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक गौरीशंकर आमटे, विठ्ठल केंद्रे, अमर करणे, मनीष वैद्य यांनी घटनास्थळाची पाहणी करून पुढील तपास सुरू केला आहे. ठाणेदार सदाशिव ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.




# ट्रॅक्टर आणि क्रुझरचा भीषण अपघात तीन जण जागी ठार,पंधरा जण जखमी

**गंगापुर । प्रतिनिधी**

गंगापुर-वैजापुर रस्त्यावर बुधवारी (दि. १५) रात्री १० वाजेच्या सुमारास वाडगाव पाटीच्या पुढे तांबुळगोटा फाटच्याजवळ एक भीषण अपघात झाला. उस वाहतूक करणारा ट्रॅक्टर आणि क्रुझर जीप यांच्यात धडक होऊन तीन जण जागीच ठार झाले, तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातातील मृतकांमध्ये एक दिड वर्षाचं बालक वैद्विक (नंदन), प्रेमलता वय ५८ आणि अक्षिता वय २१ यांचा समावेश आहे.

क्रुझर जीप शिर्डी येथील असून, तेलंगणा येथील काही भाविक शिर्डी दर्शनासाठी आले होते. त्यानंतर ते वेरुळ येथे गळणेश्वराचे दर्शन करून शिर्डीकडे परत येत होते. अंधारात ट्रॅक्टर समोर आल्याने क्रुझर जीप चालक राम वसंत कापुरे (४५ वर्ष) यांना ते दिसले नाही आणि अपघात झाला. जखमींमध्ये श्रीनिवास प्रेमलता (५० वर्ष), शरण्या श्रीनिवास (१७ वर्ष), प्रसन्नालक्ष्मी (४५ वर्ष), व्यंकन्ना (३८ वर्ष) हे तेलंगणा येथील निवासी आहेत.

किरकोळ जखमींमध्ये कृष्णमुर्ती (६५ वर्ष), बजुरी (४३ वर्ष), श्रेवंती (३७ वर्ष), प्रणावी (१२ वर्ष), दीपक (७ वर्ष), यामिनी (३५ वर्ष) आणि रमादेवी (५५ वर्ष) यांचा समावेश आहे.

योगायोगाने गंगापुर पोलिसांची गाडी तिथून जात असताना अपघाताची माहिती मिळाली आणि पोलिसांनी त्वरित मदत केली. जखमींना गंगापुर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करून त्यांना उपचार दिले गेले. गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे पाठवण्यात आले.घटनेची अधिक माहिती मिळवण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# अपघातांचे प्रमाण रोखण्यासाठीच रस्ता सुरक्षा अभियान-कल्पना गाडेकर

**ठाणे । रविंद्र धारवणे**

वाहनचालकांनी हेल्मेट न वापरणे, नशेत वाहन चालवणे, वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे, शिटबेल्ट न लावणे आणि रस्ता ओलांडताना सिग्नल न पाहणे यांसारख्या अनेक कारणांमुळे राष्ट्रीय महामार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले आहे. हे अपघात रोखण्यासाठी वाहनचालकांमध्ये नियमांची जागरूकता निर्माण करणे, तसेच रस्ता सुरक्षा जाणीव वाढवणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे पोलीस उपअधीक्षक कल्पना गाडेकर यांनी शहापूर येथे आयोजित रस्ता सुरक्षा अभियानात बोलताना सांगितले.




गेल्या सहा महिन्यात राष्ट्रीय महामार्गावर अपघातांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. वाहन चालकांनी आपली सावधगिरी बाळगून वाहने चालवावी, अशी सूचना सपोनि छाया कांबळे यांनी केली. वाहनचालकांच्या निष्काळजीपणामुळे अपघात घडत असल्याचे पोलीस निरीक्षक संतोष खानविलकर यांनी यावेळी सांगितले.या अभियानात पोलीस निरीक्षक नंदू उघडे, योगेश हजारे, सरपंच सुनील भेरे, रामकृष्ण निचीते, जगदीश पवार, विठ्ठल भेरे आणि जिवरक्षक सामाजिक संस्थेचे रविंद्र मडके उपस्थित होते. यावेळी रस्ता सुरक्षा नियमांची माहिती आणि जनजागृती केली गेली.

# नगरपंचायतच्या भोंगळया कारभारामुळे नागरिक खड्यात!

**उमरखेड । प्रतिनिधी**

उमरखेड तालुक्यातील ढाणकी शहरात नागरिकांनी ज्या प्रचंड प्रमाणात कर भरला आहे, त्यावरून नगरपंचायतीच्या भोंगळ कारभाराचा मोठा पर्दाफाश झाला आहे. ढाणकी नगरपंचायतने नागरी दलितेतर वस्ती सुधार योजना सन २०२३ ते २०२४ अंतर्गत सुभाष वाईन बार ते गजानन जिल्हावार यांच्या घरापर्यंत रस्ता तयार केला होता, परंतु दोन महिन्यांतच तो खराब झाला. याच रस्त्यावर ऐ. पी. जे. अब्दुल कलाम चौक येथे केलेल्या गटाराला झाकण नाही, ज्यामुळे अपघातांची संख्या वाढली आहे.



दवाखान्याजवळ असलेल्या या रस्त्यावर ऐ. पी. जे. अब्दुल कलाम चौक येथे उघड्या गटारामुळे वाहने जखमी होण्याचे प्रमाण वाढले आहे. आजच शोएब खान यांच्या मुलाचा पाय उघड्या गटारात पडून दुखापत झाल्याची घटना घडली. याआधीही एका वृद्ध व्यक्तीचा याच ठिकाणी अपघात झाला होता. नागरिकांकडून हा सवाल उपस्थित केला जात आहे की, नगरपंचायतच्या अधिकारी या गंभीर समस्येकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आहेत, आणि अपघात घडल्यावरच त्यांना जाग येणार का? नगरपंचायत मुख्य अधिकारी यावर त्वरित दखल घेऊन गटारावर झाकण बसवावे, अशी नागरिकांची मागणी आहे.

**उमरखेड तालुक्यातील ढाणकी येथील नागरिक नगरपंचायतला सर्वाधिक कर देतात, परंतु पायाभूत सुविधांची अत्यंत कमी उपलब्धता आहे. रस्ते, पथदिवे, हायमास्ट लाईटिंग पोल आणि अपूर्ण उघडे गटार ही नगरपंचायतीची प्रमुख समस्या बनले आहेत. या समस्यांचा त्वरित आणि कठोर दखल घेणे आवश्यक आहे.**
**- शे. जब्बार भाई, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चा, तालुका अध्यक्ष**

# अनधिकृत वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर महसूल विभागाची कारवाई

**वर्धा । प्रतिनिधी**

अनधिकृत गौण खनिज वाहतूक रोखण्यासाठी महसूल विभागाने केलेल्या विशेष मोहिमेत आर्वी व रोहणा परिसरात अनधिकृत वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर जप्त करण्यात आले. ही कारवाई तहसील कार्यालयाच्या पथकाने केली. जप्त वाहनांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. सदर मोहिमेअंतर्गत महसूल पथक गस्त घालत असताना आर्वी व रोहणा येथे परवानगीशिवाय वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर आढळून आले. या वाहनांना तातडीने जप्त करून आवश्यक दंडात्मक कारवाई करण्यात आली



ही कारवाई जिल्हाधिकारी वान्मथी सी. आणि उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तहसीलदार हरीश काळे, नायब तहसीलदार देविदास सोरटे, मंडळ अधिकारी आणि तलाठी यांच्या पथकाने या मोहिमेत भाग घेतला.महसूल विभागाच्या या धडक कारवाईमुळे अनधिकृत वाळू वाहतुकीवर आळा बसण्याची शक्यता आहे.

# माळशिरस पंचायत समिती मधील शाखा अभियंता अँटी करप्शनच्या जाळ्यात अडकला

**माळशिरस । प्रतिनिधी**

माळशिरस पंचायत समितीच्या बांधकाम उप विभागातील कनिष्ठ अभियंता शशिकांत सयाजी चौगुले यांना लाच घेताना अँटी करप्शनच्या पथकाने गुरुवार दि. १६/०१/२०२५ रोजी अडकवले. चौगुले यांनी तक्रारदारांकडून एक लाख रुपयांची लाच मागितली होती, परंतु तक्रारदार यांनी पन्नास हजार रुपये दिल्यानंतर अँटी करप्शन विभागाने त्यांना रंगेहाथ पकडले.

लाच लुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे यांच्या पथकाने ही कार्यवाही केली. तक्रारदार यांना आवश्यक कामाचे मोजमाप व बिले काढण्यासाठी लाच मागितली होती, आणि शशिकांत चौगुले यांनी या मागणीवर पन्नास हजार रुपये स्वीकारले.




या कारवाईने माळशिरस पंचायत समितीमध्ये एकच खळबळ उडाली आहे. ज्या दिवशी ही घटना घडली, त्या दिवशी माळशिरस पंचायत समितीमध्ये सर्व अधिकारी उपस्थित होते. अँटी करप्शनच्या पथकाने चौगुलेला पकडल्यानंतर पंचायत समिती काही वेळासाठी मोकळी झाली. लाचलुचपत प्रतिबंधक अँटी करप्शन सापळा विभागाच्या पथकाने पोलीस हवालदार शेलार, पोलिस कॉन्स्टेबल दिनेश माने आणि पोलिस नाईक किरण चिमटे यांच्या सहकार्याने कारवाई केली. गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

# भोयरे ग्रामदैवत जगदंबा देवी यात्रेनिमित्तच्या जंगी कुस्ती मैदानाचा पै.उमाजी चव्हाण ठरला मानकरी

**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ तालुक्यातील भोयरे येथील ग्रामदैवत श्री जगदंबा देवीच्या यात्रेनिमित्त आयोजित जगदंबा केसरी २०२५ कुस्ती मैदानाने प्रेक्षकांचा उत्साह शिगेला पोहोचवला. मैदानभर भरलेल्या प्रेक्षकांची नजरेची एकच गोष्ट होती - जगदंबा केसरीचा मानकरी कोण होणार? शेवटची कुस्ती लागली आणि काहीच क्षणात उमाजी चव्हाण यांनी विजय मांडवे यांच्यावर डंकी डाव टाकून विजय मिळवला, ज्यामुळे प्रेक्षकांचा उत्साह अपार होता.या कुस्ती स्पर्धेचे आयोजन श्री जगदंबा देवीच्या यात्रेच्या निमित्ताने करण्यात आले होते. उद्घाटनाचं काम पैलवान आणि पंच कमिटीच्या हस्ते पार पडले. विविध लहान-मोठ्या कुस्त्यांच्या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर, जगदंबा केसरी २०२५ साठी एक किलो चांदीची गदा, कै. काकासाहेब करणावर यांच्या स्मरणार्थ करणावर बंधू यांच्या वतीने ठेवण्यात आलेल्या आणि रोख ८१ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले.




स्पर्धेतील दुसऱ्या बक्षीसासाठी गणेश चव्हाण व अंकुश बंडगर यांच्यात कुस्ती झाली, जी बरोबरीत सोडवण्यात आली. तिसऱ्या कुस्तीसाठी खासबा मदने व करण मिसाळ यांच्यात झालेल्या कुस्तीत मदने जखमी झाल्याने बरोबरीत निर्णय घेण्यात आला.

या कुस्ती स्पर्धेसाठी पंच म्हणून रावसाहेब चव्हाण, आण्णा गाडेकर, शहाजी फंड, भीमराव मुळे, गणेश वाघमोडे, डॉ. गोपाळ शिराळ, आण्णा आलदर, बाळासाहेब चवरे, आबासाहेब पवार, विलास चव्हाण यांनी काम केले. कुस्तीच्या यशस्वितेसाठी गणेश करणावर, बालाजी साठे, ब्रम्हदेव फंड, रावसाहेब चव्हाण, आण्णासाहेब परीट, अमर साठे, मयूर थोरबोले, आबासाहेब पवार, मल्हारी माळी, विशाल साठे, सर्जन साठे, आप्पा सिरसट, शंकर फंड, आणि जगन्नाथ फंड यांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले.ग्रामदैवत श्री जगदंबा देवीच्या यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भोगी, आरती, आराधी मंडळाची गाणी आणि इतर धार्मिक कार्यक्रमांमध्ये भाविकांची मोठी गर्दी होती. देवीच्या छबीला आणि पालखीला मोठ्या धुमधडाक्यात काढण्यात आले, ज्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.

# संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या

## बहुजन संघर्ष सेनेने केले करमाळ्यात आंदोलन

**सोलापूर । प्रतिनिधी**

संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळावा यासाठी बहुजन संघर्ष सेनेने करमाळा तहसील कार्यालयासमोर निदर्शने आंदोलन केले. बहुजन संघर्ष सेनेचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कदम यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणा देत तहसील कार्यालयाचा परिसर दणाणून सोडला.आंदोलनादरम्यान बोलताना राजाभाऊ कदम म्हणाले, संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या झाली असून हे पाहून संपूर्ण महाराष्ट्र हळहळला आहे. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांवर मोका आणि कलम ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल होणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्राची ही ठाम मागणी आहे.

त्याचप्रमाणे, सोमनाथ सूर्यवंशी यांचा न्यायालयीन कोठडीत पोलिसांच्या अमानुष मारहाणीत मृत्यू झाला. या प्रकरणात दोषी ठरलेल्या पोलीस अधिकाऱ्यांवर कलम ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करावा, तसेच सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला एक कोटी रुपयांची मदत तातडीने देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. सूर्यवंशी परभणी येथील शिवाजी महाराज लॉ कॉलेजमध्ये विधी शिक्षण घेत होते. त्यांच्या मृत्यूमुळे संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना कायद्याच्या कचाट्यातून सुटता कामा नये, असे ते म्हणाले.

परभणीत संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्याने आंबेडकरी जनता रस्त्यावर उतरली. पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशनद्वारे तरुण भीमसैनिकांवर गुन्हे दाखल केले. हे गुन्हे शासनाने मागे घ्यावेत, कारण अशा घटनांना जबाबदार गृहखाते व पोलीस प्रशासन आहे, असे कदम यांनी स्पष्ट केले.

कदम पुढे म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ईव्हीएमवर न घेता बॅलेट पेपरवर घ्याव्यात. ईव्हीएमविरोधात देशभर आवाज उठत आहे. जनता दिशाभूल करण्यासाठी भाजप नेते वारंवार वादग्रस्त विधाने करत आहेत.करमाळ्यातील महसूल व पोलीस प्रशासनाने नागरिकांच्या समस्या तत्काळ सोडवल्या नाहीत, तर करमाळा 'बीड' होण्यास वेळ लागणार नाही, असा इशारा राजाभाऊ कदम यांनी दिला.या आंदोलनात सोगावचे सरपंच विनोद सरडे, सालसेचे सरपंच सतीश ओहोळ, खातगावचे सरपंच अविनाश मोरे, उमरडचे सरपंच संदीप मार्कड, भीमराव घाडगे, शहराध्यक्ष आजिनाथ कांबळे, तालुकाध्यक्ष अंगद लांडगे, एड. राहुल कांबळे, तसेच शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.




# सिडीसीसी बैंकेविरोधात आंदोलनकर्त्यांचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांना निवेदन

## चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील नोकर भरतीत मागासवर्गीयांचं आरक्षण हटवल्याने व भ्रष्टाचार कारवाईची मागणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील नोकर भरतीत मागासवर्गीय एससी, एसटी व ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण हटवून खुल्या प्रवर्गात प्रत्येक उमेदवार यांच्याकडून पैसे घेऊन बैंक संचालक भ्रष्टाचार करत असल्याने मागील २ जानेवारी पासून आरक्षण बचाव संघर्ष कृती समिती द्वारे साखळी ठिय्या आंदोलन सुरु होते व आज मनोज पोतराजे यांनी आमरण उपोषण सुरु केले आहे, दरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलन कर्त्यांची भेट घेतली नसल्याने चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यात राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन हे आल्यानंतर त्यांची प्रियंदर्शनी सभागृहात आंदोलनकर्त्यांनी भेट घेऊन निवेदन दिले व भ्रष्ट मार्गाने होणारी नोकर भरती स्थगित करावी अशी मागणी केली.

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादितची नोंदणी महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम ९(१)नुसार नोंदणी करण्यात आलेली आहे.त्यास बँकिंग विनिनियम अधिनियम १९४९ नुसार बँकेचे व्यवहार करण्यास भारतीय रिझर्व बँकेनी परवानगी दिलेली आहे. चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस वेळोवेळी निघणाऱ्या शासकीय योजनेच्या अनुषंगाने अर्थसाहाय्य प्राप्त होत असते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ नुसार शासनाचे व बँकिंग विनिनियमन अधिनियम १९४९ नुसार भारतीय रिझर्व बँकेचे नियंत्रण आहे. दरम्यान या बैंकेने त्यांच्या बैंक उपविधीमध्ये २०१३ ला जी ९७ वी घटना दुरुस्ती केली त्यात त्यांनी बैंक नोकर भरतीत मागासवर्गीयांना आरक्षण व पदोन्नती मध्ये मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढण्या संदर्भात निर्णय घेऊन मागासवर्गीयांचं आरक्षण स्वीकारलं परंतु आता या बैंकेत जी ३६० पदांची नोकर भरती आहे त्यात त्यांनी मागासवर्गीयांचं आरक्षण लागू न करता खुल्या प्रवर्गात सर्व जागा भरण्याचं काम सुरु केलं आहे जे घटनाबाह्य आहे.

चंद्रपूर जिल्हा बँकेच्या सार्वत्रिक निवडणुका २०१२ मध्ये ५ वर्षासाठी झाल्या.



वास्तविक पाहता २०१७ मध्ये निवडणूक काही न्यायालयीन अडथळा निर्माण झाल्याने अजुनपावेतो निवडणुक झाली नाही. आता २०२४ आहे. परंतु या संचालक मंडळाविरुद्ध ४ पोलीस/-उइ च्या कार्यवाह्या, न्यायालयात चार्ज शीट दाखल, म.रा.सहकारी कायद्याच्या कलम ८८ अंतर्गत आर्थिक नुकसानीची कार्यवाही, कलम ७९ चे निर्देश इत्यादी अनेक तक्रारी असतांना त्याच संचालक मंडळाकडून नोकर भरती करण्यास महाराष्ट्र सरकार सहकार्य करून भष्ट्राचारास खतपाणी घालत आहे हे अत्यंत दुर्भाग्यपूर्ण असून भ्रष्टाचारी यांना पुन्हा भ्रष्टाचार करण्याची एक प्रकारे बैंक संचालकांना मुभा दिल्यासारखी आहे असा आरोप आंदोलन कर्त्यांनी केला आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की बँकेस ३६० पदांची नोकरभरतीस परवानगी महाविकास आघाडीच्या काळात दि. १७फेब्रू. २०२२ ला तत्कालीन सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली होती.तत्कालीन मा.आमदार व आताच्या चंद्रपूर जिल्ह्याच्या खासदार प्रतिभाताई सुरेश धानोरकर यांनी २०२२ चे हिवाळी व २०२३ चे अर्थ संकल्पीय अधिवेशनात चंद्रपूर बँकेचे कालबाह्य संचालक मंडळानी अनेक गैरव्यवहाराबाबत तक्रारी केलेल्या होत्या, तत्कालीन सहकार मंत्री महोदयांनी बँकेवर कार्यवाही करण्याचे आश्वासन विधानसभेत दिले होते, हे विधिमंडळ कामकाजाचे रेकॉर्डला आहे. महाविकास आघाडीचे सरकारनी नोकरभरतीस स्थगिती दिली होती. बँकेनी मा.न्यायालयात प्रकरणे दाखल केलेली होती. त्यानंतर महायुती सरकारचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी देखील बँकेविरुद्ध तक्रारी असल्याने स्थगिती दिली होती. परंतु अतुल सावे ,सहकार मंत्री असतांना एस.आय.टी. चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतरही शासनानी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. दरम्यान तत्कालीन महायुतीचे सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी परीक्षा घेणाऱ्या एजेन्सीचे पॅनल करून दिले आहे. बँकेनी उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ नागपूर यांचेकडे ढउड कडून परीक्षा घेण्याचे मान्य करूनही ढउड कडून परीक्षा घेण्यास टाळाटाळ करून नवीन एजेन्सी आयटीआय या बोगस कंपनीला काम दिले आहे. बँकेविरुद्ध अनेक तक्रारी असल्याने तत्कालीन आमदार श्रीमती धानोरकर यांनी विचारलेल्या प्रश्नांवर नागपूर अधिवेशनात सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी ऑक्टोंबर २०२३ मध्ये बँकेविरुद्ध असणाऱ्या तक्रारी व १२ वर्षे होऊनही निवडणुका घेण्याबाबत प्रलंबित याचिकेत शासन त्वरित कार्यवाही करेल असे आश्वासन दिले. त्याबद्दलच्या नोंदी विधिमंडळ कामकाजात आहेत. याबाबत वर्तमानपत्रात बातम्या देखील आलेल्या होत्या. परंतु महाराष्ट्र शासन व सहकार विभागाचे अधिकारी विनाकारण बैंक संचालकांवर कार्यवाही करण्यास विलंब करून बँकेस सहकार्य करीत आहे.दरम्यान सिडीसीसी बैंक नोकर भरतीच्या परीक्षेत मोठा घोळ झाल्याने चंद्रपूर जिल्ह्यातील आमदार किशोर जोरगेवार व देवराव भोंगळे यांनी नुकत्याच पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करून बैंकसंचालक ४०-४० लाख रुपये उमेदवारांकडून घेत असल्याचा आरोप केला होता, मात्र त्यावर साधी चौकशी सुद्धा झाली नाही आणि आता ज्या परीक्षार्थींनी बैंक अध्यक्ष संचालक व एजंट कडे पैसे दिले त्यांनाचं परीक्षेत पास करण्यात आले असून जे विद्यार्थी स्पर्धा परीक्षाची तयारी करण्यासाठी अभ्याशिकेत तासनतास अभ्यास करून सिडीसीसी बैंकेची परीक्षा दिली, त्यांना जणू नापास करण्यात आले आहे, कारण बैंकेच्या परीक्षेचा निकाल गुणांसह प्रकाशित न करता सरळ मुलाखती करिता त्यांच्या जवळच्या व ज्यांनी पैसे दिले त्यांना बोलावले आहे, एकीकडे मागासवर्गीय एससी, एसटी आणि ओबीसी प्रवर्गाच आरक्षण संपवलं आणि दुसरीकडे परीक्षेत घोळ करून हुशार विद्यार्थ्यावर अन्याय केला त्यामुळे ही नोकर भरती प्रक्रिया पूर्णपणे नियमबाह्य घटनाबाह्य आणि बैंक संचालक यांच्या मानमानी कारभाराने होत असल्याने या विरोधात आरक्षण बचाव संघर्ष कृती समिती द्वारे दिनांक २ जानेवारी पासून बैंक मुख्यालयासमोर साखळी ठिय्या आंदोलन सुरु आहे व आजपासून आमरण उपोषण सुरु झालं आहे, त्यामुळे राज्यपाल यांनी त्वरित बैंकेच्या नोकर भरतीला स्थगिती देण्याचे आदेश शासनास देण्यास भाग पाडावे, कारण मार्च २०२३ च्या कायाद्याप्रमाणे राज्यातील सगळयां सहकारी संस्थावार कार्यवाही करण्याचे अधिकार सरकारला प्राप्त झाले आहे, त्यामुळे बैंकेच्या नोकर भरतीवर स्थगिती आणून भ्रष्टाचार थांबवावा अशी विनंती सुद्धा आंदोलन कर्त्यांनी राज्यपाल यांच्याकडे दिलेल्या निवेदनातून केली आहे.

# शिर्डीत १८ व १९ जानेवारी ला राष्ट्रवादीचे अधिवेशन

> **विधानसभा निवडणुकीत पक्षाला मोठे यश मिळाले. त्यामुळे पदाधिकारी व कार्यकर्ते उत्साहित आहेत. त्यांचा हाच उत्साह पक्षाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही यश मिळवून देईल. या शिबिरात जास्तीत-जास्त सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट कार्यकर्त्यांना देण्यात येणार आहे. त्यामुळे या शिबिराला वेगळे महत्व आहे. आम्ही शिबिराचे तयारीला लागलो आहोत.**
> **-आशुतोष काळे,आमदार**




**शिर्डी । प्रतिनिधी**

आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व त्या पार्श्वभूमीवर पक्ष बांधणी, यासाठी भाजपाने शिर्डीत नुकतेच राज्यस्तरीय अधिवेशन घेतले. त्यानंतर आठवडाभरातच भाजपाचा सत्तेतील सहयोगी पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटानेही याच मुद्द्यांवर शिर्डीत पक्षाचे अधिवेशन आयोजित केले आहे.

अजितपर्व..! दिशा विकासाची, पुरोगामी विचारांची..! हे घोषवाक्य असलेल्या या शिबिराचे 'नवसंकल्प' असे नामकरण करण्यात आले आहे. येत्या १८ व १९ जानेवारी असे दोन दिवस शिर्डीतील हॉटेल पुष्पक येथे हे शिबीर होईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या या शिबिराला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह पक्षाचे सर्व ज्येष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि पक्षसंघटना बांधणी यावर राज्यस्तरीय दोन दिवसांचे शिबिरात मंथन आणि नियोजन होणार आहे. याच वेळी सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ होणार आहे. पहिल्यांदा अजित पवार स्वत: नोंदणी करतील. राज्यभरात सदस्य नोंदणीचा कार्यक्रम त्यानंतर लगेच सुरू होणार आहे.राष्ट्रवादीचे आमदार आशुतोष काळे आणि राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस संग्राम कोते यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच एक बैठक झाली. या बैठकीत जिल्हाध्यक्ष कपिल पवार, तालुकाध्यक्ष संदीप सोनावणे, बाबासाहेब कोते, रमेश गोंदकर, दीपक गोंदकर आदी उपस्थित होते. नियोजनाच्या दृष्टीने या बैठकीत चर्चा करण्यात आली.

# स्वामी चिंचोलीच्या असीम शेखची कबड्डीत स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर निवड

**दौंड । प्रतिनिधी**

स्वामी चिंचोली (ता.दौंड) येथील असीम जुबेर शेख (वय १८) याची उत्तराखंड येथे होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या कुमार संघात निवड करण्यात आली आहे. जानेवारी महिन्यात ही स्पर्धा आयोजित करण्यात आली असून असीम शेख हा शेख वस्ती स्वामी चिंचोली येथील गरीब कुटुंबातील मुलगा असून गेली सात वर्षे तो कबड्डी खेळत आहे. तो बारामती येथील स्पोर्ट्स अकॅडमी येथे सराव करत असून देशाला कबड्डी खेळात सुवर्णपदक प्राप्त करून द्यायचे आहे.असा विश्वास असीम शेख याने यावेळी व्यक्त केला.



असीमच्या महाराष्ट्र संघातील निवडीचे स्वामी चिंचोली परिसरातून स्वागत होत आहे.

असीम शेख हा अतिशय गरीब कुटुंबातील मुलगा असून त्याचा आदर्श स्वामी चिंचोली आणि परिसरातील युवकांनी घ्यावा.त्याने कबड्डी स्पर्धेत आई,वडीलांचा,गावाचा आणि महाराष्ट्राचा आजून नवलौकिक वाढवावा. तो अतिशय जिद्दी असून कबड्डी स्पर्धेत चांगली कामगिरी करणार असा मला आत्मविश्वास आहे. अझरभाई शेख मा.सरपंच स्वामी चिंचोली.

# विजयाच्या संकल्पाची मशाल हृदयात प्रज्वलित करा आ.सुधीर मुनगंटीवार यांचे प्रेरणादायक मार्गदर्शन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

प्रयत्न करणाऱ्याला कधीही अपयश येत नाही. हृदयात प्रयत्नांची मशाल तेवत ठेवा आणि विजयाच्या संकल्पाची मशाल प्रज्वलित करा. त्यानंतर जगातील कुठलीही शक्ती तुम्हाला पराभूत करू शकणार नाही, असे प्रेरणादायक शब्द आ. सुधीर मुनगंटीवार, राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री, यांनी खेळाडूंचे मनोबल वाढवताना दिले.

चंद्रपूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन आ. श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला आयटीआयचे (आयएमसी) अध्यक्ष सी. एम. राव, जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी वैभव बोनगीरवार, प्राचार्य श्री. वानखेडे, क्रीडा अधिकारी श्री. आवारे, स्टेट बँकेचे अधिकारी श्री. पवनकर, भा.ज.पा. महामंत्री डॉ. मंगेश गुलवाडे, भा.ज.पा. नेते प्रकाश धारणे, मोरेश्वर गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.आ. मुनगंटीवार म्हणाले, या जिल्ह्यात 'मिशन ऑलिम्पिक २०३६' ची सुरुवात केली आहे. आपल्या जिल्ह्यातील खेळाडूंमध्ये शक्ती, गुण आणि कौशल्य आहे. परंतु त्यांना प्रयत्नांची जोड द्यावी लागेल. जणू काही बीज जमिनीत पेरून त्याला खतपाणी दिल्यास झाड होते, तसेच आपल्या हृदयातही बीज आहे, परंतु त्याला वृक्ष करण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे.

त्यांनी चंद्रपूरचे लोक हे कुठेही कमी नसल्याचे सांगितले. सी फॉर चंद्रपूरप्रमाणेच, चंद्रपूरच्या लोकांमध्ये सी फॉर चॅम्पियन होण्याची क्षमता आहे, असे ते म्हणाले. चंद्रपूर जिल्हा स्टेडियमला ५७ कोटी रुपयांचा निधी दिला असून, बॅडमिंटन हॉल, बल्लारपूर, सैनिक शाळेचे स्टेडियम यासारख्या अनेक उत्तम सुविधांबद्दल ते अभिमानाने बोलले.




### तरच मेरा भारत महान!

२०२० पर्यंत भारताने १२० वर्षांत केवळ २८ पदकं जिंकली, तर अमेरिकेने २५२० आणि रशियाने १२२२ पदकं जिंकली. २०४७ मध्ये स्वातंत्र्याच्या शताब्दीत भारताचा तरुण सक्षमपणे पुढे गेलेला असेल, तरच मेरा भारत महान! होईल, अशी भावना आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

### स्टेडियम बांधून पदक मिळणार नाही

पदक मिळवण्यासाठी फक्त स्टेडियम बांधून चालणार नाही. त्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. नवीन चंद्रपूर म्हाडामध्ये १६ एकर जागेत वीर बाबुराव शेडमाके यांच्या नावाने भव्य स्टेडियम तयार होईल,असे आ.मुनगंटीवार यांनी सांगितले.